वर्ष : ०४, अंक : २५१
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध






बुलडाणा, मंगळवार, दि.२२ एप्रिल २०२५







# नॅशनल हेराल्ड प्रकरणावरून भाजप युवा मोर्चाची तीव्र निदर्शने

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, नागपूर :** नॅशनल हेराल्ड प्रकरणावरून भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने नागपूरमध्ये तीव्र आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात भाजप कार्यकर्त्यांनी काँग्रेस नेत्या सोनिया गांधी व राहुल गांधी यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. तसेच शहर काँग्रेस मुख्यालयाचे घेराव करण्याचाही प्रयत्न करण्यात आला. आंदोलनादरम्यान सोनिया गांधी व राहुल गांधी यांचे पुतळेही जाळण्यात आले. यामुळे काही काळ परिसरात तणावाची परिस्थिती निर्माण झाली.




अलीकडेच प्रवर्तन संचालनालयाने (ईडी) नेशनल हेराल्ड प्रकरणात चार्जशीट दाखल केली आहे. या चार्जशीटमध्ये राहुल गांधी व सोनिया गांधी यांची नावे नमूद करण्यात आली आहेत. ईडीच्या म्हणण्यानुसार, या प्रकरणातून सर्वाधिक फायदा या दोन्ही नेत्यांना झाल्याचा दावा करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता युवा मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष अमित मोरे यांच्या नेतृत्वाखाली नागपूरमध्ये आंदोलन आयोजित करण्यात आले.

हे आंदोलन महाल परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर करण्यात आले. यावेळी भाजप कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. सोनिया गांधी हाय हाय, राहुल गांधी मुरदाबाद अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलन अधिक तीव्र करण्याच्या उद्देशाने कार्यकर्ते शहर काँग्रेस मुख्यालयाच्या दिशेने कूच करू लागले.

शहर काँग्रेस कार्यालय (देवडिया भवन) घेरण्याचा भाजप कार्यकर्त्यांचा प्रयत्न पोलिसांनी उधळून लावला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळून घोषणाबाजी करत कार्यकर्ते काँग्रेस कार्यालयाच्या दिशेने निघाले. मात्र, घटनास्थळी तैनात असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला. पोलीस वारंवार विनंती करत होते की, शांतता राखावी व कायदा सुव्यवस्था भंग करू नये. तरीही कार्यकर्ते पुढे जात राहिले. अखेर, पोलिसांनी चिटणीस पार्क चौकात कार्यकर्त्यांना अडवून पुढे जाऊ दिले नाही.

# मुंबई ते नाशिक मार्गावर लवकरच लोकल ट्रेन धावणार...

**अक्षराज : संजय पंडित**

**दि. २१, मुंबई :** राज्यातील रेल्वे प्रवाशांसाठी अक्षय तृतीयाच्या आधीच आनंदाची बातमी समोर येत आहे विशेषता राजधानी मुंबई ते नाशिक यादरम्यान प्रवास करणाऱ्या रेल्वे प्रवाशांसाठी आजची बातमी अधिक आनंदाची राहणार आहे. कारण की भविष्यात मुंबई ते नाशिक दरम्यान लोकल ट्रेन धावताना दिसणार आहे. मि ळालेल्या माहितीनुसार कसारा ते मनमाड या नवीन रेल्वे मार्ग प्रकल्पाला नुकतीच मंजुरी देण्यात आली आहे.







खरे तर मुंबई ते नाशिक या दरम्यान दररोज हजारो नागरिक प्रवास करत असतात. यामुळे या दरम्यान उपनगरीय रेल्वे सेवा म्हणजेच लोकल ट्रेन सुरू झाली पाहिजे अशी मागणी केली जात होती. मात्र प्रवाशांच्या या मागणीकडे रेल्वे बोर्डाकडून फारसे गांभीर्याने पाहिले जात नव्हते. कारण म्हणजे या मार्गावर लोकल सुरू करण्यात एक मोठा अडथळा होता आणि तो अडथळा होता तो म्हणजे कसारा घाटाचा.

पण आता हा मोठा अडथळा दूर झाला आहे कारण की कसारा ते मनमाड या दरम्यान एक नवीन रेल्वे मार्ग तयार केला जात असून या नव्या रेल्वे मार्गामुळे आता नाशिक ते मुंबई दरम्यान कसारा घाट वगळून थेट लोकल ट्रेन धावणे शक्य होणार आहे. या नव्या रेल्वे मार्गावर दोन मोठे बोगदे राहणार आहेत पण मार्गावरील चढ-उतार कमी राहणार आहे. यामुळे प्रवाशांना जलद आणि सुरक्षित प्रवासाचा अनुभव घेता येणार आहे. दरम्यान या नवीन रेल्वे मार्गबाबत सविस्तर माहिती अशी आहे की, कसारा घाट ते मनमाड या रेल्वे मार्गाचे अंतर १४० किलोमीटर इतके असून दरम्यान सध्या अस्तित्वात असणाऱ्या याच मार्गाला आता समांतर रेल्वे ट्रॅक टाकला जाणार आहे.

अर्थातच नवीन मार्ग सुद्धा १४० किलोमीटरचाच असेल. या नव्या रेल्वे मार्गात कसारा घाटात बोगदा तयार केला जाणार आहे आणि यात रेल्वे लाईन टाकली जाईल. बोगद्याचा डायमीटर सुद्धा वाढणार आहे.

तसेच या मार्गावर चार स्थानके विकसित होतील ज्यामुळे कसारा ते मनम ाड यादरम्यानचा प्रवास वेगवान होणार आहे आणि या परिसरातील एकात्मिक विकासाला चालना मिळणार आहे. या प्रस्तावित मार्गावरील रेल्वे स्टेशन बाबत बोलायचं झालं तर नव्या मार्गावर न्यू नाशिक रोड, न्यू पाडळी, वैतरणा नगर आणि चिंचल खैरे हे चार स्थानके तयार आहेत.

या प्रकल्पाच्या खर्चाबाबत बोलायचं झालं तर या प्रकल्पासाठी जवळपास ४००० कोटी रुपयांचा खर्च गृहीत धरण्यात आला आहे. यामुळे आता या प्रकल्पाचे काम नेमके कधी सुरू होणार आणि हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर खरंच मुंबई ते नाशिक दरम्यान लोकल ट्रेन धावणार का? हे मात्र पाहण्यासारखे ठरणार आहे.

# पतीच्या निधनाचा धक्का असह्य... काही तासातच पत्नीनेही प्राण सोडले

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, बुलडाणा :** लग्नात सात जन्माची सोबत निभावण्याची शपथ घेणाऱ्या एका दाम्पत्याच्या आयुष्याचा शेवटही सोबतच झाला. पतीचे हृदयविकाराने निधन झाल्यानंतर दुःख सोसले न गेल्याने पत्नीचेदेखील काही वेळातच निधन झाले. दोघांच्या पार्थिवावर एकाच चितेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा तालुक्यातील डोढ्रा येथे ही हृदयद्रावक घटना घडली.

मोतीसिंग परिहार (वय ७५) यांना शनिवारी पहाटे चार वाजताच्या सुमारास हृदयविकाराचा धक्का बसला. पतीच्या निधनाची बातमी ऐकताच पत्नी अन्नपूर्णा परिहार (६५) यांच्यावर मनावर मोठा आघात झाला.



दुःखावेग असह्य झाल्याने त्यांनीही दुपारी जगाचा निरोप घेतला. एकाच दिवसात काही तासांच्या फरकाने पती-पत्नीचे निधन झाल्याने परिहार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. मोतीसिंग आणि अन्नपूर्णा यांनी आयुष्यभर एकमेकांची साथ दिली. एकाच चितेवर त्यांना भडाग्नी देण्यात आला. अंत्यसंस्काराच्या वेळी गावकरी बहुसंख्येने उपस्थित होते.

### नेमकं काय झालं?

२० एप्रिल रोजी सकाळी चार वाजता मोतीसिंग परिहार (वय वर्ष ७५) यांना अचानक हृदयविकाराचा तीव्र झटका आला. कुटुंबीयांनी तातडीने वैद्यकीय मदत मिळवण्याचा प्रयत्न केला. परंतु दुर्दैवाने त्यांचे प्राण वाचवता आले नाहीत. पतीच्या निधनाची बातमी पत्नी अन्नपूर्णा यांना सहन झाली नाही. दुपारच्या सुमारास त्यांनीही अखेरचा श्वास घेतला.

मोतीसिंग परिहार आणि अन्नपूर्णा परिहार हे डोढ्रा गावातील प्रेमळ जोडपे म्हणून ओळखले जात होते.

दोघांनी आपले संपूर्ण आयुष्य एकमेकांच्या साथीने व्यतीत केले. त्यामुळे त्यांच्या निधनाने केवळ परिहार कुटुंब नाही, तर संपूर्ण गाव हळहळ व्यक्त करत आहे. दोघांच्या अंत्ययात्रेला गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. सायंकाळी मोतीसिंग आणि अन्नपूर्णा यांच्यावर एकाच चितेवर संस्कार करण्यात आले. यावेळी उपस्थित असलेल्या प्रत्येकाने मन गहिवरले होते.

परिहार दाम्पत्याच्या पश्चात त्यांचा मुलगा चरणसिंग मोतीसिंग परिहार आणि मुलगी शालुबाई विनोद (राहणार वाघापूर) असा परिवार आहे. अन्नपूर्णा परिहार यांचे माहेर बेराळा येथील होते. या दुःखद घटनेमुळे दोन्ही कुटुंबावर दुःखाचा पहाड कोसळला आहे. यातून परिहार कुटुंब आणि नातेवाईकांना सावरण्यासाठी गावकऱ्यांनी आणि मित्र परिवाराने निधी आणि आधार देण्याचा प्रयत्न केला आहे.

मोतीसिंग परिहार हे केवळ एका कुटुंबाचे आधार नव्हते, तर ते राजकीय, सामाजिक आणि सांप्रदायिक क्षेत्रातील एक वटवृक्षाप्रमाणे होते. त्यांच्या सावलीत अनेक जणांनी आश्रय घेतला. त्यांच्या जाण्याने परिहार कुटुंबच नाही, तर संपूर्ण गावाचा एक मार्गदर्शक हिरावला आहे.

राजकीय क्षेत्रात त्यांनी आपल्या कणखर नेतृत्वाने आणि लोकांप्रती असलेल्या निष्ठेने एक वेगळी ओळख निर्माण केली. त्यांनी नेहमी सामान्यांच्या हक्कासाठी संघर्ष केला आणि विकास कामांना नवी दिशा दिली. त्यांचा स्पष्ट विचार आणि धडाडीचे निर्णय आजही कार्यकर्त्यांना प्रेरणा देत राहतात.

## थोडक्यात

### रिक्षा चोरी करणाऱ्या सराई चोरट्याला केले जेरबंद




**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२१, कल्याण (ठाणे) :** कोळसेवाडी पोलीस ठाणेचे हद्दीत दि१८ रोजी रात्रीच्या वेळी, जिम्मी बाग, कर्पेवाडी कल्याण पुर्व येथे फिर्यादी नाव राजेश देवीदयाल मेहुलीया वय ४६ वर्षे, काम रिक्षा चालक राह. जय श्रीहरी सोसा चाळ न १, रूम नं ८, जिम्मी बाग, कर्पेवाडी कल्याण पुर्व यांची रहाते घरासमोर पार्क केलेली रिक्षा ही अज्ञात इसमाने चोरी करून नेली म्हणुन कोळसेवाडी पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ३१४/२०२५ भा.न्या. संहिता २०२३ चे कलम ३०३ (२) प्रमाणे दि. २०/०४/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आले.

सदर दाखल गुन्हयाचे तपासात गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंम लदार यांनी तांत्रीक माहीती व गुप्त बातमीदारांमार्फत माहीती काढून कौशल्यपुर्ण तपास करून अनोळखी आरोपी निष्पन्न करून रेकॉर्डवरील आरोपी प्रांजल मनोज बर्वे, वय २६ वर्षे, राह. रूम नं १५, योगेश अर्पा, करपे वाडी, न्यु जिम्मी बाग, कल्याण पुर्व यास चोरी केलेल्या रिक्षा सह शिताफीने पकडून दि. २१ रोजी अटक केली व त्याचेकडून गुन्हयातील चोरी केलेले ६५,०००/- रू. किमतीची चक-०५-उत्रक्ष-८६७२ रिक्षा जप्त करण्यात आली आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त, परीमंडळ ३, कल्याण अतुल झेंडे, व सहा. पोलीस आयुक्त कल्याण विभाग कल्याणजी घेटे यांचे मार्गदर्शनाखाली कोळसेवाडी पोलीस ठाणेचे वपोनिरी. गणेश न्हायदे, सहा.पो.निरी. दर्शन पाटील, सहा.पो.निरी. संदीप भालेराव, पोहवा/४२० बुधवंत, पोहवा /२१५ जाधव, पोहवा/१४७१ भामरे, पोहवा/५०३वाघ, पोहवा / ३११२ सौंदाणे, पोहवा/६५९६जरग, पोहवा/६२५६कापडी, पोशि/ २६५६ सोनवळे, पोशि/२१३७ सोनवणे यांचे पथकाने केलेली आहे.

### चंद्रपूर ते शिर्डी थेट बससेवा पूर्ववत सुरु करा : खा.प्रतिभा धानोरकर




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, चंद्रपूर :** चंद्रपूर ते शिर्डी व शिर्डी ते चंद्रपूर अशी थेट एस.टी. महामंडळाची सेवा तातडीने सुरु करण्यात यावी, अशी मागणी चंद्रपूरच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांनी राज्य परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे केली आहे.

शिर्डी येथील साईबाबा मंदिर हे भाविकांचे श्रध्दास्थान असून चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातून हजारो भाविक दरवर्षी शिर्डी येथे दर्शनासाठी जात असतात. कोरोना काळापासून ही बससेवा बंद करण्यात आली आहे. रेल्वे गाड्यांचे बुकिंग वेळेवर उपलब्ध होत नसल्यामुळे आणि खाजगी वाहनांनी प्रवास करणे अनेकांना परवडत नसल्याने भाविकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते.

त्यामुळे एस.टी. महामंडळाने थेट चंद्रपूर-शिर्डी अशी बस सेवा सुरु केल्यास भाविकांसाठी प्रवास अधिक सुलभ आणि सोयीस्कर ठरेल, असे मत खासदार प्रतिभा धानोरकर यांनी व्यक्त केली.

चंद्रपूरच्या महाकाली देवी मंदिरापासून ते शिर्डीच्या साई मंदिरापर्यंतचा धार्मिक प्रवास एस.टी. सेवेमुळे अधिक सुलभ होईल आणि ग्रामीण भागातीलही भाविक या सेवेम ुळे लाभ घेऊ शकतील असेही त्या म्हणाल्या. राज्य परिवहन महामंडळाने या मागणीचा गांभीर्याने विचार करुन लवकरच ही सेवा सुरु करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## संपादकीय



## बदलत्या हवामानाचा सर्वच क्षेत्रांना फटका

बदलत्या हवामानाचा सर्वच क्षेत्रांना फटका बसत आहे. त्यातही कृषी क्षेत्रावर त्याचा जास्तच परिणाम होताना दिसत आहे. सध्या एप्रिल महिना चालू आहे. सर्वत्र कडाक्याचे ऊन जाणवत आहे. सर्वच शहरांचे तापमान ४० अंशाच्या घरात आहे. विदर्भातील काही भागात तर तापमान ४२ ते ४५ अंश सेल्सिअस नोंदवले जात आहे. तापमान वाढल्याने लोकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. कडाक्याच्या उन्हामुळे लोकांना अनेक आजार होत आहेत. या कडाक्याच्या उन्हात लोकांना चक्कर येणे, हृदय विकाराचा झटका येणे, रक्तदाब वाढणे, शरीरातील पाणी कमी होणे, डोळ्यांचे विकार जडणे, लहान मुलांचा घोळणा फुटणे, उष्माघात होणे असे प्रकार घडतात. उष्माघाताने काहींचा जीवही गेला आहे. दोन वर्षापूर्वी खारघर मध्ये घडलेली घटना अजूनही ताजीच आहे. उष्माघातामुळे महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यात १५ श्री सेवेकरांना जीव गमवावा लागला होता. कडाक्याच्या उन्हात जास्तीतजास्त पाणी पिण्याचा सल्ला डॉक्टरांकडून दिला जात आहे. तसेच फळांचा ज्यूस सेवन करण्यास सांगितले जाते. डॉक्टरांकडून दुपारी ११ ते ४ घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला जातो मात्र पोटापाण्यासाठी लोकांना घराबाहेर पडावेच लागते. एकीकडे कडाक्याचे ऊन असताना राज्यातील काही भागात मात्र वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. पुढील काही दिवस देशातील काही भागात अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. अवकाळी पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान होते. फळबागा जमीनदोस्त होतात. हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातो. क्षणात होत्याचे नव्हते होते. वर्षभराच्या मेहनतीवर पाणी पडते. अवकाळी पाऊस झाला की बळीराजाच्या काळजाचा ठोका चुकतो. ऐन उन्हाळ्यात अवकाळी पाऊस पडणे ही गेल्या काही वर्षातील नित्याची बाब झाली आहे. जम्मू काश्मीर सारख्या निसर्गाच्या नंदनवनात काल निसर्गाने काल जो प्रकोप दाखवला तो पाहून सगळ्यांच्याच काळजाचा ठोका चुकला. जम्मू काश्मीरमध्ये ढगफुटी झाली. या ढगफुटीने जम्मू काश्मीरमध्ये हाहाकार उडाला. क्षणात संपूर्ण प्रदेश जलमय झाला. प्रचंड पाऊस आणि भूस्खलन झाल्याने तीन जनांना आपला जीव गमवावा लागला. या ढगफुटीने जम्मू काश्मीरमधील जनजीवन विस्कळित झाले. शेकडो लोकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करावे लागले. तिथे अजूनही बचावकार्य चालू आहे. ऐन उन्हाळ्यात निसर्गाने दाखवलेल्या या उग्र रूपाने सर्वजण आवाक झाले. जम्मू काश्मीरमध्ये अशा प्रकारचा पाऊस यापूर्वी पाहिला नव्हता असे तेथील जुने जाणते लोक सांगत आहेत. केवळ जम्मू काश्मीरच नाही तर देशातील अनेक राज्यात अशाप्रकारचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. ईशान्य आणि दक्षिणेकडील काही राज्यात विजेच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. आसाम, मेघालय, अरुणाचल प्रदेशात २२ ते २४ तारखे दरम्यान अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. झारखंड, ओडिशा, पश्चिम बंगाल, आणि छत्तीसगड मध्ये २० ते २४ दरम्यान मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे केरळ, कर्नाटक, लक्षद्वीप, आंध्रप्रदेश, तेलंगणा या दक्षिणेकडील राज्यातही पावसाची शक्यता वर्तवली आहे. म्हणजेच देशातील एका भागात कडाक्याचे उन तर दुसऱ्या भागात मुसळधार पाऊस अशी विषम परिस्थिती आहे. कडाक्याचे ऊन, अवकाळी पाऊस, गारपीट, चक्रीवादळ या घटना आताच घडतात असे नाही तर वर्षभर घडत असतात. महाराष्ट्र हे सह्याद्रीच्या कुशीत वसले आहे. पूर्वी सर्व ऋतूंचे आगमन वेळेवर होत होते. मागील काही वर्षात ऋतुमानात मोठे बदल पाहायला मिळत आहे. ऋतुमानच बदलले आहे. पूर्वी पाऊस फक्त पावसाळ्यातच पडत असे आता वर्षभर कोठेना कोठे पाऊस पडताना दिसतो. पावसाळ्यात दोन दोन महिने पाऊस पडत नाही. कधीकधी दोन दिवस इतका पाऊस पडतो की दोन दिवसात दोन महिन्याची सरासरी भरून काढतो. त्यामुळे कोणत्या ऋतूत कोणते पीक घ्यावे याबाबत शेतकरी संभ्रमात असतो. बदलत्या हवामानामुळे काहींनी शेती करणेच बंद केले आहे. राज्यात मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणात जंगलतोड वाढली आहे. कॉंक्रीटीकरण वाढले आहे. शहरे सिमेंटचे जंगले बनली आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास झाला आहे. त्यामुळे वातावरणात बदल होत आहे. वातावरणातील बदलामुळे या घटना घडत आहेत. निसर्गाच्या या बदलत्या चक्राचा मानवजातीवरच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीवरच परिणाम होत आहे. लोकांनी यातून धडा घेऊन आतापासूनच निसर्ग नियमाने जगणे सुरू करायला हवे. वृक्षतोड थांबवली पाहिजे, जंगलतोड थांबवली पाहिजे. वृक्षलागवड करून ती जगवली पाहिजेत. माणसाने निसर्गावर केलेले आक्रमण थांबवले पाहिजे. जर माणसे निसर्ग नियमाच्या विरुद्ध गेले तर त्याची मोठी किंमत येणाऱ्या पिढीला मोजावी लागेल.

# यावे ज्ञानासाठी निघावे सेवेसाठी



ज्ञान मिळवण्याचे ठिकाण म्हणजे विद्यामंदिर. या विद्येच्या मंदिरात पूर्वी वयाच्या सहाव्या वर्षी प्रवेश मिळत असे. सध्याच्या काळातील बदलत्या शिक्षण पद्धतीप्रमाणे वर्ग पहिलीच्या अगोदर प्लेग्रुप,नर्सरी,केजी वन, केजी टू, इथून शाळेची सुरुवात झालेली दिसून येते.मागील साधारण दोन दशक अगोदर वयाचे सहा वर्ष पूर्ण झाले की, वर्ग पहिली व त्या अगोदर एक दोन वर्ष अंगणवाडी, बालवाडी मुलाला दाखल केल्या जायचे. तेही त्याच्या आवडीनुसार शाळेत जाणं असायचं. अंगणवाडी आणि बालवाडी म्हणजे केवळ खिचड, सुगडी, मटकीची उसळ खायला जायचे. मात्र सध्याच्या काळात खाजगी शाळांमध्ये प्लेग्रुप पासूनच भरमसाठ शैक्षणिक शुल्क भरून मुलांना शाळेत दाखल केल्या जात आहे.

वर्ग पहिलीत अक्षर ओळख,अंक ओळख, बालगीते,काही शिस्तीची धडे शिकवल्या जातात. विद्यार्थीयाने शाळेत पाऊल टाकल्यापासून तेथील शैक्षणिक वातावरणात विद्यार्थी रममान होतो. व शैक्षणिक पद्धतीनुसार शिक्षकांच्या मदतीने ज्ञान आत्मसात करतो. वर्ग दुसरी मध्ये मराठी वाचन, इंग्रजी बाराखडीची ओळख, बेरीज, वजाबाकी तर वर्ग तिसरी मध्ये जोडाक्षरांची ओळख, गुणाकार, भागाकार, नात्यांची ओळख आजूबाजूच्या भौगोलिक परिस्थितींची माहिती, लोकजीवन असे शिकवल्या जाते अशाच पद्धतीने दहावीपर्यंत विद्यार्थी जवळपास चांगल्या प्रकारे गणिती व्यवहार, भाषेचे ज्ञान, राजकारण, समाजातील घडामोडी, साहित्य क्षेत्राविषयी ज्ञान, घेऊन बऱ्यापैकी शिक्षित होतो. वयाच्या सोळा वर्षी तो मॅट्रिक अर्थात बोर्डाची परीक्षा पास होतो. त्यानंतर अकरावीत व बारावीत त्याला राज्य, देश तथा आंतरराष्ट्रीय घडामोडी विषयी ज्ञान मिळते. त्याला त्याच्या निवडलेल्या शाखेनुसार पुढील शिक्षणात व्यवसायाची संधी प्राप्त करता येते. कला शाखा असेल तर साहित्य, इतिहास, समाज शास्त्र, राज्यशास्त्र याची ओळख तर विज्ञान शाखेत रसायन शास्त्र, जीवशास्त्र, भौतिक शास्त्र ई.विषयाची ओळख आणि वाणिज्य शाखा असेल तर आर्थिक व्यवहार याविषयी ज्ञान मिळते. काही विद्यार्थी दहावी नंतर व्यावसायिक शिक्षणा कडे वळतात. आयटीआय, तांत्रिक शिक्षण वगैरे हे दोन वर्ष पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थी साधारण अठरा वर्षाचा पूर्ण होतो. याबरोबरच त्याला भारताचा नागरिक म्हणून मतदानाचा अधिकार मिळतो. तसेच तो शासकीय सेवेत नोकरीसाठी अर्ज दाखल करू शकतो. राज्य सरकार, केंद्र सरकार,निमशासकीय अथवा सहकारी क्षेत्रात असो यामध्ये तो आपण मिळवलेल्या शिक्षणा नुसार, ज्ञानानुसार अर्ज सादर सादर करून सरकारी सेवेत रुजू होऊ शकतो.

विद्यार्थी म्हणून शैक्षणिक पद्धतीनुसार वयाच्या चार वर्षापासून ते अठरा वर्षापर्यंत तो वेगवेगळ्या ज्ञानाच्या मंदिरात, विद्यालयात जाऊन ज्ञान मिळवतो व ज्ञानी अर्थात शिक्षित होतो. तसेच त्या पुढील ही शिक्षण चालूच ठेवतो. अविरत अभ्यास मेहनत करत असतो. भारताच्या मतदान यादी तील नागरिक्तवा प्रमाणे तो वयाच्या अठराव्या वर्षी भारताचा नागरिक म्हणून जबाबदार म्हणून ओळखला जातो. त्याचप्रमाणे त्याचे कर्तव्य आहे की, विद्येच्या मंदिरात जे ज्ञान मिळवले, आत्मसात केले त्याच्या उपयोग समाजासाठी, राष्ट्रहितासाठी कसा करता येईल असा प्रयत्न करायला हवा. आपल्या बौद्धिक क्षमतेनुसार आपण ज्ञान प्राप्त करतो. आवडीनुसार आवडीच्या क्षेत्रानुसार त्यात रस घेऊन त्या दिशेने प्रयत्न करतो. प्रत्येक व्यक्तीमध्ये काहीतरी कला दलेली असते. आवड, संधी व मेहनतीनुसार त्याला यश प्राप्त होते. एकाच शाळेतील विद्यार्थी असतात. एकाच वर्गात शिकतात. मात्र एकाच वर्गातील विद्यार्थी पुढील शिक्षण घेऊन सरकारी नोकरी करत नाही. सगळेच व्यवसाय किंवा शेती करत नाही. त्यापैकी काहीजण शरीरयष्टीने बलदंड असल्यास सैनिक तथा पोलीस दलात भर्ती होतात. काही जणांना अभ्यासात जास्त रुची असल्यास व्यावसायिक शिक्षण घेऊन शिक्षक, डॉक्टर, इंजिनियर होतात. अभ्यासात फारसा रस नसणारे परंतु इतर व्यवसायात रुची असणारे छोठ्या -मोठ्या उद्योग क्षेत्राकडे वळतात. काहींजण वडिलोपार्जित, त्यांच्या आवडीनुसार किंवा वाकचातुर्यानुसार राजकारणामध्ये रस घेऊन राजकीय पदे मिळवतात. या सर्व क्षेत्रांमध्ये आपण घेतलेल्या शालेय ज्ञानानुसार संधी मिळते. स्वतःला घडवण्याची व समाजाच्या सेवेबरोबर राष्ट्राची सेवा करण्याची संधी मिळते.

विद्यार्थ्यांने विद्यालयातून ज्ञान प्राप्त केल्यानंतर आवडीच्या क्षेत्रात यश मिळवून समाजाची सेवा करावी. क्षेत्र कुठले असो सेवा ती सेवा असते. एक शिक्षक विद्यार्थ्यांना शाळेत ज्ञानदानाचे कार्य करत असेल, संस्कार व नवीन पिढी घडवण्याचे कार्य करत असेल तर अतिशय इमानेईतबारे ज्ञानदान करावे. पोलीसांच्या हाती समाजातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याचे कार्य असते ते त्यांनी अगदी प्रामाणिकपणे केल्यास गुन्हेगारी प्रवृत्ती वाढीस लागणार नाही व त्यावर आळा बसेल. भारतीय सैनिक भारत मातेची सेवा करतो. शेतकरी राजा शेतात अहोरात्र काबाड कष्ट करून आपल्या सर्वांचा अन्नदाता होतो. काही अभियांत्रिकीय व वैज्ञानिक क्षेत्रात ज्ञान मिळून नवनवीन शोध लावून राष्ट्राच्या विकासात हातभार लावतात. काही व्यवसायिक जसे की, सुतार लोहार, चांभार, शिंपी न्हावी आपल्या घरगुती गरजा भागवतात.काही व्यावसायिक दैनंदिन उपयोगाच्या वस्तू पुरवतात. त्याचप्रमाणे आपले आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी वैद्य म्हणून आरोग्य जपण्याचे कार्य करतात. कार्य कुठलेही घ्या. यातून सेवाच घडणारच...! अगदी सफाई कामगार असेल तर तोही समाजाची सेवाच करतो. त्याचप्रमाणे रोड रस्त्यावरील कचरा जमा करणारे, नाली गटारातील ओला व सुका कचरा साफ करणारे हे कामगार सुद्धा तेवढेच महत्त्वाचा आहे, जेवढे ज्ञानदानाची कार्य करणारा शिक्षक, भारतीय सैन्यात देशाची सेवा करणारा सैनिक, तर राजकारणातील एखादा नगरसेवक आमदार, खासदार मात्र, प्रत्येकाने प्रथम आपण या समाजाचे, राष्ट्राचे सेवक आहोत ही भावना मनामध्ये रुजवायला हवी. मनात कुठल्याही प्रकारचा अहंकार न बाळगता आपण केवळ भारत मातेचे पुत्र आहोत अशी भावना रुजवायला हवी. आपण या ज्ञानाच्या मंदिरातून वर्ग पहिलीपासून एकच धडा शिकलो की, भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत. याचे जिवंत उदाहरणं म्हणजे एकाच वर्गात ज्ञान घेतांना वेगवेगळ्या जाती धर्म पंथातील असलो तरी गुण्यागोविंदाने खेळतो, बागडतो ज्ञान मिळवतो कारण ज्ञानासाठी हे ज्ञान मंदिर सर्वांसाठी खुले आहे. येथून जेव्हा शिक्षित होऊन, ज्ञानी होऊन बाहेर पडणार तेव्हा, या भूमीचे पुत्र म्हणून, या समाजाचे सेवक म्हणून बाहेर पडा.या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या सेवेसाठी करा. सदैव समाज हित,राष्ट्रहित जोपासा.

**विद्यार्थ्यांनो मित्रांनो!** विद्येच्या मंदिरात ज्ञान आत्मसात करण्यासाठी आलात तर,अविरत मेहनत, अभ्यास करा वेगवेगळ्या क्षेत्रात ज्ञान मिळून ज्ञानी व्हा. समाजाप्रती प्रेमाची, सहकार्याची, सलोख्याची, समर्पणाची भावना ठेवून समाज सेवेसाठी निघा. प्रत्येक विद्यालयात, ज्ञानमंदिरात शिकणाऱ्या माझ्या चिमुकल्या, कुमारवयीन तथा तरुण विदयार्थी मित्रांनो या ज्ञानासाठी व निघा सेवेसाठी....!

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.नं.९७६३२८२०७७**

## धाकटी..

विवाद नको फुकाचा
कोण गं मोठी धाकटी
सोडून चालले व-हाड
अगदीचं पडले एकटी

घेण्यापेक्षा निवृत्ती ती
सोडतो वृत्तीकळकटी
एकप्रयास जिंकण्यास
सरकून पहावी सोंगटी

सोंग घेऊनि मित्रत्वाचे
दोरक बांधावे मनगटी
मिडीयावाले दावणीस
विधाना देती बळकटी

जमला डाव तर उत्तम
बांधे अन्यथा वळकटी
पुरे वृत्ती आक्रस्ताळी
व्यस्तराहते कळिकटी

विस्तवात अधिकराख
विझूनचालली आगटी
शांतता हवी जिवाला
नकोशा होई कटकटी

रात्रीच्याअंधारात चाले
आयात तिकडे चोरटी
ऐवज उचलून न्यायला
टपलेली मंडळी भुरटी

आकर्षकबनवावे चित्र
बदलू सगळ्या चौकटी
सोईची होता सोयरिक
हो सुरेख नवरी नकटी

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वृत्त, अचूक बातमी

## वाचक पत्र

### तर दिल्लीचा बंगाल होईल.... !

दिल्लीतील सिलमपूर भागात कुणाल गांधी नावाच्या एका हिंदू तरुणाची नुकतीच हत्या करण्यात आल्याचे वृत्त वाचनात आले. तेथील मुसलमान समाजातील ४ ते ५ तरुणांनी चाकूने भोसकून ही हत्या केल्याचे कुणाल यांच्या नातेवाईकांचे आणि स्थानिकांचे म्हणणे आहे. या हत्येमुळे परिसरात प्रचंड तणाव निर्माण झाला असून नागरिकांवर भीतीचे सावट पसरले आहे. या भयामुळे परिसरातील हिंदूंनी त्यांच्या घरावर 'हिंदू पलायन', 'घर विकणे आहे', 'योगीजीं आम्हाला मदत करा', 'रेखा गुप्ताजी आमचे रक्षण करा' अशा प्रकारचे पोस्टर्स लावले आहेत. तेथील नागरिक पोलीस प्रशासनाकडे सातत्याने संरक्षणाची मागणी करत आहेत. हिंदूंची ही दयनीय स्थिती पाहिल्यावर दिल्ली नक्की भारतात आहे की पाकिस्तानात असा प्रश्न स्वाभाविकपणे पडतो. जगाच्या पाठीवर कोठेही गेलो तरी तेथील बहुसंख्यांकाचा प्रभाव अल्पसंख्यांकांवर जाणवतो. इथे मात्र स्थिती त्याउलट आहे. हिंदूंनी सातत्याने नमते धोरण घेतल्याने आज त्यांच्याच घरात त्यांचे राहणे अवघड झाले आहे. हल्लीच झालेल्या विधानसभा निवडणुकीत दिल्लीतील जनतेने हिंदुत्वाच्या मुद्यावर भाजपाला विजयी केले. त्यामुळे दिल्लीतील हिंदूंना भयमुक्त करणे आणि दिल्लीतील धर्मांध वृत्ती ठेचून काढण्याचे काम भाजपने प्राधान्याने करायला हवे नाहीतर दिल्लीचा बंगाल व्हायला वेळ लागणार नाही.

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

## उन्हाळ्यात मुलांना घरगुती पेय द्या !



सध्या सर्वत्र उन्हाचा जोर वाढतो आहे. मागील काही वर्षांच्या तुलनेत यंदा अधिक उकाडा सहन करावा लागणार असल्याचा अंदाज हवामान खात्यानेही वर्तवला आहे. राज्यात काही ठिकाणी मुलांच्या परीक्षा संपून शाळांना सुट्टी पडली आहे. अभ्यासाचा ताण नसल्याने मुले दिवसभरातील अधिकाधिक वेळ खेळण्यात व्यतीत करत आहेत. बाहेर खेळायला जाणाऱ्या मुलांना उन्हातान्हाची पर्वा नसते. अधिक वेळ उन्हात राहिल्याने घामावाटे शरीरातील पाणी आणि क्षार निघून जातात ज्यामुळे थकवा येतो. अशावेळी मुले घरी येऊन पालकांकडे कोल्ड्रिंक्स पिण्यासाठी पैसे मागतात. बऱ्याचदा पालकही त्यांना पैसे देऊन त्यांची इच्छा पूर्ण करतात. सध्या बाजारात मिळणारे अनेक प्रसिद्ध ब्रँड्सचे कोल्ड्रिंक्स लहान मुलांसाठी अपायकारक आहेत. अशा कोल्ड्रिंक्सच्या बाटल्यांवर ठळक अक्षरांत तशी सूचना लिहिणेही बंधनकारक करण्यात आले आहे. ही कोल्ड्रिंक्स जिभेला रुचकर वाटून मनाला गारवा देणारी असली तरी ती बनवण्यासाठी रसायनांचा आणि प्रीझर्वेटिव्हचा वापर करण्यात येत असल्याने लहान मुलांच्या नाजूक शरीरासाठी ती अत्यंत हानिकारक असतात.

आहारतज्ज्ञांच्या मते कोल्डड्रिंक्समध्ये जास्त प्रमाणात साखर असते. साखर जास्त प्रमाणात पोटात गेल्याने मुलांमध्ये लठ्ठपणा वाढू शकतो. मुले जास्त प्रमाणात कोल्ड्रिंक्स पिट असतील तर त्यांच्या शरीरातील कॅलरीज वाढल्याने त्यांचे अनावश्यक वजन वाढू शकते. कोल्ड्रिंक्समध्ये असणाऱ्या साखर आणि अन्य रासायनिक घटकाकांमुळे मुलांचे दात किडण्याचा धोका संभवतो. थंड आणि रसायनयुक्त असलेले हे कोल्ड्रिंक्स दातांच्या मुळांना कमकुवत करतात. मुलांच्या शरीरातील साखरेचे प्रमाण वाढल्याने मुलांमध्ये टाइप २ डायबिटीसचा धोका वाढू शकतो. काही थंड पेयांमधील रसायनांच्या अतिवापरामुळे मुलांच्या हाडांतील खनिजांचे प्रमाण कमी होऊन हाडे कमकुवत होतात ज्यामुळे मुलांमध्ये हाडांच्या दुखापतीचा आणि फ्रॅक्चरचा धोका वाढतो. १०० टक्के फळांचा रस असण्याचा दावा करणारे काही कंपन्यांचे फ्रुट ज्यूसचे टेट्रा पॅक बाजारांत उपलब्ध आहेत; मात्र त्यामध्ये प्रत्यक्षात फळांचा रस किती आणि इतर रसायने किती आहेत हे पॅकेटवरील घटकांचे प्रमाण वाचल्यावरच लक्षात येते. त्यामुळे उन्हाळ्याच्या दिवसांत असे तयार कोल्ड्रिंक्स मुलांना देऊन त्यांच्या आरोग्याशी खेळण्याऐवजी घरी तयार केलेले कोकम सरबत, लिंबू सरबत, ताक किंवा बाजारातून ताजी फळे आणून मुलांना फळांचा रस द्यावा. घरगुती पेय प्यायल्याने उन्हामुळे मुलांच्या शरीरात निर्माण होणारी पाण्याची कमतरता तर भरून निघेलच शिवाय मुलांना व्हिटॅमीन्स आणि मिनरल्ससुद्धा या पेयांतून मिळेल. केवळ मुलांसाठीच नव्हे तर मोठ्यांनीही उन्हाळ्यात रासायनिक शीतपेय पिण्याऐवजी घरगुती पेय पिऊन आपली रोगप्रतिकारक शक्ती आणि आरोग्य जपावे !

**- सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## अंडरगारमेंट चोरी करणारा आरोपी जेरबंद




**दि.२१, येरवडा (पुणे) :** कल्याणी नगर येथील एस एल एन्टरप्रायजेस नावाचे जॉकी कंपनीचे कपडयाचे शॉपमध्ये चोरी करणारा इसम नामे गणपत डांगी हा कल्याणीनगर येथे थांबलेला आहे. ही माहिती कळताच खातारजमा करून सदरची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक येरवडा पोलीस ठाणे यांना कळवून वरिष्ठांच्या मार्गदर्शन नुसार सदर ठिकाणी एक इसम थांबलेला दिसलेने येरवडा तपास पथकाचे त्यास पळून जात असताना अतिशय शिताफीने पकडून त्यास त्याचा नाव पत्ता विचारता त्याने गणपत मांगीलाल डांगी वय ४४ (वर्षे रा. विठ्ठल नगर सिंहगड रोड पुणे) असे सांगितले. सदरबाबत येरवडा पोलीस स्टेशन गु र नं २८०/२०२५ बीएनएस कलम ३०३ (२) मध्ये कपडयाचे शॉपमधून ०८,००,०००/- रु किंमतीचे लेडीज व जेन्टस अंडरगार्मेंट चोरी केलेबाबत गुन्हा दाखल आहे. त्याचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने तपास करता त्याने जून २०२४ पासून वेळोवेळी शॉपमधून लेडीज जेन्टस अंडरगारमेंट चोरी केल्याचे कबूली दिल्याने त्याचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झालेने त्या गुन्हयाचे कामी दि. १९/०४/२०२५ रोजी २२/१५ वा अटक गुन्हा उघडकीस आणला आहे. पोलीस कस्टडी दरम्यान सदर आरोपीकडे अधिक तपास करता आरोपीकडून गुन्हयातील चोरीस गेलेल्या मालापैकी ०७,३०,०००/- रु किंमतीचे लेडीज व जेन्टस अंडरगारमेंट, टि शर्ट, नाईट पॅन्ट हस्तगत करण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक येरवडा रवींद्र शेळके, यांच्या मार्गदर्शनानुसार सपोनि सुनिल सोळुंके, पोलीस उप-निरीक्षक प्रदिप सुर्वे, पोहवा तुषार खराडे, सागर जगदाळे, भीमराव कांबळे, प्रशांत कांबळे, नटराज सुतार, विजय अडकमोल आदींनी सदर उत्कृष्ट कामगिरी केलीआहे.

## तायक्कॉडो ब्लॅक बेल्ट परीक्षेत उपनगरच्या ४१ खेळाडूंचा सहभाग




**अक्षराज : संदिप येवले**

**दि.२१, मुंबई :** तायकांडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (मुंबई) आणि तायक्कॉडो असोसिएशन ऑफ रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने २० एप्रिल २०२५ रोजी न्यू होरायझन पब्लिक स्कूल, सेक्टर १३, खांदा कॉलनी, नवीन पनवेल येथे ब्लॅक बेल्ट परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर परीक्षेसाठी महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातून खेळाडू सहभागी झाले होते. तायक्कॉडो असोसिएशन ऑफ मुंबई सबर्बन जिल्ह्यातील ४१ खेळाडूंनी परीक्षेसाठी सहभाग घेतला होता. विशेष म्हणजे आंतरराष्ट्रीय पदक विजेते खेळाडू आर्यन संदिप येवले चौथी डिग्री व सारा संदीप येवले तिसरी डिग्री परीक्षेसाठी सहभागी झाले होते. आंतरराष्ट्रीय पंच, तायक्कॉडो असोसिएशन ऑफ रायगड जिल्ह्याचे सचिव सुभाष पाटील हे परीक्षक होते.

तायक्कॉडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (मुंबई) चे महासचिव- मिलिंद पाठारे,सचिव-सुभाष पाटील, खजिनदार-व्यंकटेश करा, रत्नागिरी जिल्हा सचिव लक्ष्मण करा,मुंबई सबर्बन अध्यक्ष-संदिप येवले, सचिव - संदीप चव्हाण, खजिनदार - कल्पेश कोलांबडे, तायक्कॉडो असोसिएशन, मुंबईचे सचिव विजय कांबळे हे ब्लॅक बेल्ट परीक्षा दरम्यान उपस्थित होते. महासचिव मिलिंद पठारे व सचिव सुभाष पाटील यांनी सर्व परीक्षार्थींना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे श्रीगोंदा तालुक्यातील व अहिल्यानगर जिल्ह्यातील आणि महाराष्ट्र राज्यातील लोकांना या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे आरणगाव दुमाला, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर येथील गट नंबर १५० मिळकतीबाबत आमचे अशिल सौ.सोनाली गणेश गाडेकर रा. कोळगाव, ता. श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर यांनी श्रीगोंदा येथील मे. दिवाणी न्यायालयात रे.मु.नं. २१०/२०२३ वाटप कब्जासाठी व मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे. सदरच्या मिळकती आमचे अशिलांचे वडिलोपार्जित मालकी वहीवाटीच्या असुन सदरच्या मिळकती आमचे अशिलांचे वडिल विठ्ठल चंद्रकांत पोटे व इतर रा. आरणगाव दुमाला, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर यांचे नावावर असुन ते आमचे अशिलांचा कायदेशीर हिस्सा बुडविण्याच्या गैरउद्देशाने सदर मिळकत विक्री करत आहेत. त्यामुळे ते त्यांचे नावावरील मिळकती तिन्हाईत इसमांना विक्री करण्याची भाषा वापरत असुन तसा व्यवहार करण्याचे तयारीत आहेत. परंतु आमचे अशिलांनी मिळकतीबाबत दावा दाखल केलेला असुन सदरचा दावा न्याय प्रविष्ट आहे. त्यामुळे सदर मिळकतीबाबत आमचे अशिलांचे वडिलांशी व इतरांशी कोणीही खरेदी, विक्री, गहाण, दान, बक्षीसपत्र, इत्यादी मार्गाने हस्तांतर होईल असा कोणताही व्यवहार करू नये. यदाकदाचित कोणी त्यांचेशी मिळकतीबाबत हस्तांतराचा व्यवहार केल्यास त्याचे खर्चाची व परिणामांची सर्वस्वी जबाबदारी खरेदी घेणार यांचेवर राहील याची नोंद घ्यावी.

शिक्का

**अहिल्यानगर**
दि.२२/०४/२०२५

**ॲडव्होकेट**
ॲड.श्री.किरण एस. होले
मो.नं. ८८८७५३०७८
सनद नं. MAH/8123/2021
पत्ता-जिल्हा व सत्र न्यायालय समोर,
वड़ली रोड श्रीगोंदा मो.८७८८७५३०७८


# आ. मुनगंटीवार यांनी मतदारसंघातील विकासकामांसाठी घेतली गडकरी यांची भेट

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी बल्लारपूर विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामांसाठी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. नितीन गडकरी यांची भेट घेतली. आ. मुनगंटीवार यांनी विविध रस्ते व उड्डाणपुलांच्या काम ासाठी दिलेल्या निवेदनावर ना. गडकरी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. तसेच बल्लारपूर विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आ. मुनगंटीवार यांच्या सदैव पाठिशी असल्याचा विश्वासही दिला. निवेदनामध्ये मूल शहरानजीक असलेल्या रेल्वे ओव्हर ब्रिजचे काम, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९३० मूल-चंद्रपूर या राष्ट्रीय महाम ार्गाच्या दोन्ही बाजूंना आरसीसी काँक्रीट ड्रेन मंजूर करणे, केंद्रीय मार्ग निधीच्या (सेंट्रल रोड फंड) माध्यमातून बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील विकासकामांना मंजुरी देणे, तसेच कोठारी गावाजवळील २ किमी अपूर्ण रस्त्याचे काम पूर्ण करणे यांचा समावेश आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर तहसीलमध्ये कोठारी गावाजवळील पुलानजीक २ किमी रस्त्याचे अपूर्ण बांधकाम काम पूर्ण करण्याची विनंती आ. मुनगंटीवार यांनी केली. नॅशनल हायवे ३५३ बी बल्लारपूर-आष्टी राष्ट्रीय महामार्गाचे बांधकाम काम पूर्ण झाले आहे. ५ वर्षांचा कालावधीही पूर्ण झाला आहे. या मार्गावरील पुलाजवळ २ किमी रस्त्याचे काम प्रलंबित आहे.



या मार्गावर बर्याच ठिकाणी मोठे खड्डे असल्याने रहदारीला गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. तसेच याठिकाणी म ोठे अपघातही झाले आहेत. या २ किमी. रस्त्याचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी गावकऱ्यांनी संबंधित विभागाकडे अर्ज केला आहे, परंतु आतापर्यंत कार्यवाही झालेली नाही, याकडे आ. मुनगंटीवार यांनी लक्ष वेधले. त्याचवेळी चंद्रपूर जिल्ह्यातील मुल-चंद्रपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९३० वर, केंद्रीय रस्ते निधीतून मुल शहराजवळील रेल्वे ओव्हरब्रिजचे बांधकाम व्हावे, असेही निवेदन त्यांनी ना. गडकरी यांना दिले.

मुल शहराजवळील रेल्वे म ार्गावरून मोठ्या संख्येने वाहने जातात. तसेच याच मार्गाने मालगाडीचीही वाहतूक होते. त्यामुळे प्रत्येक अर्धा तासाला रेल्वे क्रॉसिंगवर गेट बंद होतो आणि वाहतूक खोळंबते. परिणामी रुग्णांना वेळेत उपचार मिळण्यास अडचणी येतात. शिवाय सरकारी काम करणार्या नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना वेळेवर पोहोचण्यात बर्याच अडचणींचा सामना करावा लागतो, याकडेही मंत्री महोदयांचे लक्ष वेधण्यात आले. मुल-चंद्रपूर या राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूंनी अंदाजे ८ किलोमीटरचे आरसीसी काँक्रिट ड्रेन मंजूर करण्याची विनंतीही आ. मुनगंटीवार यांनी केली. हा महामार्ग बल्लारपूर विधानसभा म तदारसंघात आहे.

या राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजुंना चंद्रपूर जिल्ह्यातील जानाळा, आगडी, गोंडसावरी, म हादवाडी, अजयपूर, चिचपल्ली, वलनी, घंटाचौकी आणि लोहारा ही गावे आहेत. या गावांतर्गत महामार्गाच्या बाजुला जुना अरुंद नाला आहे. हा नाला तुटलेला असल्याने घाण पाण्याचा निचरा होत नाही. रस्त्यांची सुरक्षा आणि नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने या नाल्याच्या पुनर्बांधणीच्या कामाला मंजुरी देण्यात आली आहे. या गावांतर्गत राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजुंना आरसीसी काँक्रीट नाल्याच्या मंजुरीची आवश्यकता आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या राष्ट्रीय महामार्गाच्या डांबरी रोडची रुंदी ७ मीटर आहे. याठिकाणी प्रस्तावित आरसीसी काँक्रीट ड्रेन आणि डांबरी रस्ता अश्या एकूण ४८.०८ कोटी रुपयांच्या खर्चाचे अंदाजपत्रक राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या नागपूर येथील अधिक्षक अभियंत्यांना सादर करण्यात आले आहे. आपण त्यात लक्ष घालून कृपया तातडीने मंजुरी द्यावी, अशी विनंती आ. मुनगंटीवार यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना केली आहे. बल्लारपूर विधानसभा मतदारसंघातील बल्लारपूर, मुल, पोंभुर्णा तालुक्यांमध्ये वेगाने औद्योगिकीकरण सुरू झाले आहे. हे तालुके चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांच्या सीमेलगत आहेत. त्यामुळे रहदारीच्या दृष्टिकोनातून काही रस्त्यांचे व पुलांचे निर्माणकार्य आवश्यक असल्याची बाब आ. मुनगंटीवार यांनी मंत्री महोदयांकडे उपस्थित केली.

# ‘झिरो माईल’ च्या जागेसाठी संघर्ष कायम ठेवा - दिलिप मेश्राम

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२१, नागपूर :** रामटेक लोकसभा क्षेत्राचे माजी खासदार स्व. जतीराम बर्वे यांनी आपल्या कार्यकाळात भोई, ढीवर, कहार व अन्य उपजातीसाठी लढा दिला व विदर्भ विभागीय मच्छिमार सहकारी संघ मर्यादित नागपुरला जागा मिळवुन दिली. या जागेचा आपण सम ाज बांधवांनी सांभाळ केला नाही. नागपूर येथील झिरो माईलची जागा हे स्व. जतीराम बर्वे यांचे श्रध्दास्थान आहे. श्रद्धास्थानला हलविण्याची ताकत कुणात नाही. आपल्या जागेच्या शेजारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा आहे. व आदिवासी समाजाचे जे २०१४ मध्ये शहीद झाले त्यांचे स्मारक आहे. त्या जागेला कोणीही हटविणार नाही. त्याच परीसरात भोई, ढीवर, कहार व अन्य उपजातीचे श्रध्दास्थान म्हणुन स्व. जतीराम बर्वे यांचा पुतळा व शिल्लक जागा आहे. त्याच ठिकाणी तीन मजली इमारत होती. मेट्रोच्या सौंदर्यकरण करण्यासाठीं जागा काबीज केली होती. मात्र त्यानंतर मेट्रो विभागाने सांगीतले की, ही जागा आमच्या कामाची नाही. ज्याची जागा आहे.त्यांना




परत करा असे निर्देश काढण्यात आले.

त्यानंतर भारतीय भोई विकास मंडळ संलग्नित जीवन रक्षक दल व अन्य सामाजिक संस्था रस्त्यावर उतरून आंदोलन केले. या जागे संदर्भातील शासन कसे हटविणार आमचे श्रद्धास्थान आम्हाला मिळो यासाठी अनेक मोर्चे आंदोलने, साखळी उपोषण करून शासनाच्या निदर्शनात आणून दिले आहे. यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी प्रत्यक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राचार करून भोई समाजाचा मार्ग निकाली काढण्यासाठी आपण स्वतः लक्ष केंद्रित करून मार्ग मोकळा करण्यासाठी निर्देश दिले. व तसे भारतीय भोई विकास मंडळ कार्यालयात पत्र प्राप्त झाले आहे. आपल्या समाजबांधवांना विनंती आहे की, अभी नही तो, कभी नही, हा लढा कायम ठेवण्याची गरज असल्याचे आजची काळाची गरज असल्याचे प्रतिपादन भारतीय भोई विकास मंडळ संलग्नित जीवन रक्षक दलचे महाराष्ट्र संस्थापक अध्यक्ष दिलीप मेश्राम यांनी नागपूर येथील आयोजित कार्यक्रमात ते मार्गदर्शन करताना बोलत होते.

आदिवासी ढिवर समाज संघटना नागपुर यांच्या वतीने व अन्य सामाजिक संघटनेच्या वतीने स्व. जतीराम बर्वे यांची जयंती आयोजित करण्यात आली होते. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते सुरेश शिवरकर, भारतीय भोई विकास मंडळाचे उपाध्यक्ष मनोहर भोयर, अशोक भोयर, प्रा. राहुल गौर, फागोजी उके, प्रमोद बावणे, सुरेश करतार, किशोर करतार, कला नायक, सिमा गौर, दिलीप मांढरे, किशोर करतार, धनराज करणूके, मनोज नगरे, गोविंद डहारे, राजकुमार करनुके सह अन्य मान्यवर मोठया प्रमाणात उपस्थित होते.

# मतभेद दुर ठेवत तुंगत ग्रामदैवत जानुबाई देवी यात्रेसाठी ग्रामस्थांची एकजूट

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२१, पंढरपूर :** तुंगत (ता. पंढरपूर) येथे गावातील राजकारण व मतभेद बाजूला ठेवून गावातील ग्रामदैवत जानुबाई व बिरोबा यात्रा साजरी करण्यासाठी आयोजित बैठकीत ज्येष्ठांसह तरूण कार्यकर्त्यांनी एकजुटीचा आदर्श ठेवुन नियोजनबद्ध यात्रोत्सव पार पाडण्याचे ठरविले आहे.

गावातील ज्येष्ठ नागरिक, विविध संस्थांचे पदाधिकारी, तरुण कार्यकर्ते व ग्रामस्थांच्या पुढाकारातून पार पाडण्यात येणार्या यात्रोत्सवाची संकल्पना इतरांपुढे आदर्श निर्माण करणारी आहे.

६ मे रोजी तुंगत ग्रामदैवत यात्रोत्सव असुन यानिमित्त यात्रा कमिटीच्या माध्यमातून हि यात्रा यशस्वी करण्यासाठी तरूण युवकांनी सहभाग घेतला असुन ज्येष्ठ नागरिकांचे त्यांना मार्गदर्शन लाभणार आहे.

दोन दिवस चालणार्या या उत्सवात हारतुरे, म हानैवेद्य, महापूजा करून सवाद्य वाजतगाजत छबिना मि रवणूक; तसेच धार्मिक भजनाने अधिक रंग भरला जाणार आहे. उत्सवाचे पहिल्य दिवशी ग्रामदेवाची विधिवत पूजा करून सकाळी नऊ ते दोन यावेळात धार्मिक कार्यक्रम घेण्यात येतात. यात्रेसंदर्भात आयोजित बैठकीत राजकीय गट-तट बाजुला ठेवुन सर्व गाव पुढारी यांनी एकजूट दाखवून तरूणांचे नियोजनात हा उत्सव साजरा करण्याचा निर्णय घेतला. यावेळी यात्रा कमिटीचे तानाजी रणदिवे, सुमंत रणदिवे, अनिकेत रणदिवे, गणेश रणदिवे, सुधीर आंध, छोटू आंध, मार्गदर्शक माजी सरपंच अंगद (मास्तर) रणदिवे, तानाजी पाटील, संचालक विठ्ठल रणदिवे, आबासाहेब रणदिवे, परमेश्वर पवार, उपसरपंच प्रकाश रणदिवे, पंकज लामकाने, पंडित देठे, अमित साळुंखे, अंगद रणदिवे, कुमार नाना पाटील, नारायण रणदिवे, औदुंबर गायकवाड, महादेव देवचंद रणदिवे, दत्ता रणदिवे, वामन वनसाळे, दामोदर वाघमारे, युवराज रणदिवे, किसन पवार, गजेंद्र रणदिवे, शीकांत अवताडे, शिवाजी इंगळे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.




तुंगत ग्रामदैवत जानुबाई यात्रोत्सव थाटात साजरा केला जाणार असुन यात्रा कमिटी मधील टरण युवकांचे पुढाकाराने याची जय्यत तयारी करण्यात येत आहे. विविध धार्मिक कार्यक्रमासह म नोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन यावेळी करण्यात आले असुन जिल्ह्यासह राज्यभरातून येणार्या भाविकांना कोणतीही अडचण येणार नाही याची दक्षता यात्रा कमिटीचे सदस्य घेत आहेत.

# आ.रत्नाकर गुट्टे यांच्या हस्ते सभागृहाचे लोकार्पण

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.२१, पालम (परभणी) :** पालम तालुक्यातील खडी येथे आमदार निधीतून बांधण्यात आलेल्या सभागृहाचे शनिवार १९ एप्रिल रोजी आ. रत्नाकर गुट्टे यांच्या हस्ते लोकार्पण सोहळा पार पडला.

खडी येथे सामाजिक, सांस्कृतिक आणि अध्यात्मिक कार्यक्रम आयोजित करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत होता, ही बाब लक्षात घेऊन आ. डॉ. रत्नाकर गुट्टे यांनी आपल्या स्थानिक विकास निधीतून सभागृह मंजूर करून दिले आहे. या निधीतून बांधण्यात आलेल्या तक्षशिला बौद्धविहार सभागृहाचे लोकार्पण गंगाखेड विधानसभेचे

आ. डॉ. रत्नाकर गुट्टे यांच्या हस्ते करण्यात आले. गावखेड्यात अशी वास्तू असणे गरजेचे आहे. त्यामुळे गरजू व गोरगरीबांना कौटुंबिक सोहळे साजरे करणे शक्य होईल. ग्रामस्थांना एकत्र




येऊन विविध कार्यक्रम घेता येतील. तसेच त्यातून एकता, अखंडता जपता येईल, असे आ. रत्नाकर गुट्टे यांनी म्हटले आहे.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच रामचंद्र निळे, मित्रमंडळाचे जिल्हाध्यक्ष संदीप अळनुरे, तालुकाध्यक्ष चंद्रशेखर लांडगे, पवन सोन्नर, गंगाधर मस्के, साहेबराव नखाते, मनोहर पिनाटे, तुकाराम जी निळे, माधवराव चामले, बाबासाहेब एंगडे, सुनील एंगडे, दिपक एंगडे शीकांत मादरपले व्यंकटी करंडे छगन एंगडे राजेंद्र एंगडे बंटी निळे, यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, सोसायटीचे चेअरमन, बौद्ध उपासक, उपासिका व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्याच्या विकासात धामणीचाही समावेश होणार - पालकमंत्री आबिटकर

## जलव्यवस्थापन कृती पंधरवाडा अंतर्गत अभियंत्यांची तांत्रिक कार्यशाळा व शेतकरी संवाद

**अक्षराज : सुनिल पाटील**

**दि.२१, कोल्हापूर :** जिल्ह्याच्या विकासात धामणीचाही समावेश होणार असल्याने हा आनंदाचा क्षण सर्वासमवेत अनुभवता येणार आहे. नागरिकांची पाण्याची आस्था व श्रध्दा पूर्ण होत असून यापुढे अडचण होणार नाही असे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले. सोमवार, दिनांक २१ एप्रिल २०२५ रोजी राई येथील धामणी प्रकल्प येथे जलव्यवस्थापन कृती पंधरवाडा अंतर्गत अभियंत्यांची तांत्रिक कार्यशाळा व शेतकरी संवाद सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत झाला त्यावेळी ते बोलत होते.

पालकमंत्री आबिटकर म्हणाले की, आज माझ्यासाठी आनंदाचा क्षण आहे. धामणी मध्यम पाटबंधारे प्रकल्पांतर्गत पडसाळी, राई, राई-१ व राई-२ वसाहतीमधील पुनर्वसित गावठाण नागरी सुविधांचा लोकार्पण आज झाले. धामणीमुळे नागरिकांची पाण्याची आस्था व श्रध्दा पूर्ण होत असून यापुढे अडचण होणार नाही. यंदाच्या दिवाळीतील अभ्यंगस्नान धामणीत नक्की




करणार आहे. पूर्णत्वास येणाऱ्या या प्रकल्पास सहकार्य करणाऱ्या सर्व लोकप्रतिनिधी, महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागाचे अधिकारी, शेतकरी व नागरिकांचे यावेळी त्यांनी आभार मानले. प्रकल्पग्रस्त व शेतकरी यांच्याशी संवाद साधला.

कोल्हापूर पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता अभिजीत म्हेत्रे यांनी धामणी प्रकल्प अभियंत्यासाठी पर्यावरणाशी अभ्यासपूरक असून याचा लाभ घ्यावा. या प्रकल्पांच्या पूर्णत्वाकडे उभारणीस सहकार्य करणाऱ्या सर्व लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

कोल्हापूर पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता रोहित बांदिवडेकर यांनी धामणी प्रकल्पांची माहिती देत या प्रकल्पांमुळे शेतकरी तसेच अनेक गावांच्या नागरिकांना यामुळे पाण्याची सुविधा मिळणार असल्याचे सांगितले.

कार्यक्रमांच्या सुरुवातीला मान्यवरांचे हस्ते छत्रपती राजर्षी शाहू महाराज व भारतरत्न एम. विश्वशरय्या यांचे प्रतिमेचे पूजन करुन दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमांचे प्रास्ताविक जलसंपदा विभागाचे एस.एन. पाटील व आभार विशाल शेळोलकर यांनी केले. यावेळी राधानगरी-कागलचे उपविभागीय अधिकारी प्रसाद चौगुले, तहसीलदार अनिता देशमुख, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता अभिजित म्हेत्रे, कार्यकारी अभियंता रोहित बांदिवडेकर, भुमिअभिलेखचे जिल्हा अधीक्षक शिवाजी भोसले, एस.एन.पाटील, यांत्रिकी विभागाचे संग्राम पाटील, कोल्हापूर पाटबंधारे विभागाचे सर्व अधिकारी व यांत्रिकी अभियंता, शिवाजी चौगुले, दीपक शेट्टी, जलसंपदा विभागाचे कर्मचारी, पंचक्रोशीतील ग्रामस्थ, शेतकरी, महिला आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक नंदकुमार निर्माळे यांनी केले.

---

# गुहागरच्या लोकशाही दिनात रस्त्यावरील खड्ड्यांचा विषय तापला

## येत्या २ दिवसांत राष्ट्रीय महामार्गाच्या सक्षम अधिकाऱ्यांना जनतेसमोर बोलावणार

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२१, गुहागर (रत्नागिरी) :** गुहागर विजापूर या राष्ट्रीय महामार्गांवर गुहागर शहर ते शासकीय विश्रामगृह या रहादारीच्या प्रमुख रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांबाबत गुहागर प्रेमी नागरिकांकडून सोमवार, दिनांक २१ एप्रिल २०२५ रोजी गुहागर तहसीलदार येथे पार पडलेल्या लोकशाही दिनात विचारणा करण्यात आली, गुहागर विजापूर मार्गांवरील खड्डे येत्या ३० एप्रिल २०२५ पर्यंत चांगले कार्पेट मारून दुरुस्त करावे ही मागणी करीत गुहागर तहसीलदार कार्यालयाला गुहागर प्रेमी नागरिकांचे वतीने निवेदन देण्यात आले. लोकशाही दिनात रस्त्यावरील खड्ड्यांचा विषय चांगलाच तापला मात्र याबाबत राष्ट्रीय महामार्गचे सक्षम अधीकारी यांचेशी बोलणे करून येत्या दोन दिवसात त्यांना जनतेसमोर बोलावण्यात येईल असे आश्वासन नायब तहसीलदार मेहता यांनी उपस्थितीत जनतेला दिले.

दरम्यान या लोकशाही दिनात बोलतांना पत्रकार पराग कांबळे, सामाजिक कार्यकर्ते विशवनाथ रहाटे, अनिल शिंदे, सतीशदादा शेटे, सुमित आठवले, अभिजित मर्दा, विकास जाधव, अमित जोशी, अरुण भुवड, सखाराम अवेरे यांनी मागणी केली की येत्या ३० एप्रिलच्या आत सदरचा खड्डे पडलेला रस्ता चांगले कार्पेट मारून जनतेला उपलब्ध करून द्यावा.

अन्यथा आम्हाला पुढील आंदोलनाची दिशा निश्चित करावी लागेल या रस्त्याबाबत गुहागर नगर पंचायतचे प्रशासकीय अधिकारी यांनी सांगितले की ऑगस्ट २०२४ रोजी राष्ट्रीय महामार्ग करण्याला पत्र देण्यात आले आहे,



त्यानंतर रीमाईंड लेटर देखील देण्यात आल्याचे सांगितले सदरचा रस्ता हा अपघात काळ ठरला आहे, आम्हाला अंश रस्ता त्वरित दुरुस्त करून मिळावा अशी मागणी करण्यात आली, आजच्या लोकशाही दिनाला विविध खात्याचे प्रशासकीय अधिकारी उपस्थितीत होते. जनताजनार्दन ही मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रामुख्याने आजच्या लोकशाही दिनात महामार्ग खड्डे तसेच अन्न सुरक्षा अधिनियम २००३ चा जनतेला लाभ मिळत नाही या विषयी व गुहागर नगरपंचायत क्षेत्रातील नि.स.प्र जागा नावावर वर्ग एक होतं नसल्या बाबत विचारणा झाली. त्याचबरोबर शहरातील व इतर घरावर आलेली झाडे तोडण्याची मागणी करण्यात आली. दरम्यान आजचा लोकशाही दिन खेळीमेळीच्या वातावरणात पार पडला गुहागर प्रेमी नागरिक मोठया संख्येने उपस्थितीत होते. शेवटी नायब तहसीलदार मेहता यांनी नागरिकांचे आभार मानले.

---

# आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमिवर पालकमंत्री यांनी केली विविध ठिकाणची पाहणी

## वाखरी पालखी तळ, भक्ती सागर (६५ एकर) व नदी पात्राची पाहणी



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२१, पंढरपूर :** आषाढी शुद्ध एकादशी सोहळा दिनांक ०६ जुलै २०२५ रोजी होणार असून या सोहळ्यासाठी श्री ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम पालखी सोहळ्याबरोबर तसेच अन्य संताच्या पालखी सोबत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. वारी कालावधीत येणाऱ्या वारकरी भाविकांना अधिकच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात या अनुषंगाने ग्रामविकास तथा पंचायत राज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आज पंढरपूर येथील विविध ठिकाणची पाहणी केली व अनुषंगिक मार्गदर्शक सूचना दिल्या.

यावेळी पालकमंत्री गोरे यांनी वाखरी पालखीतळ, वाळवंट, चंद्रभागा नदीपात्र, घाट तसेच पत्रा शेड येथे होणाऱ्या नियोजित दर्शन मंडप व स्काय वॉक बाबतची माहिती घेऊन संबंधित ठिकाणची पाहणी केली. त्याचबरोबर भक्ती सागर (६५ एकर) येथे होणाऱ्या नियोजित संत नामदेव स्मारक जागेची पाहणी करून, भक्ती सागर येथे मोठ्या प्रमाणात सावली देणारी, पानगळ कमी असणारी तसेच कमी पाण्यात वाढणाऱ्या झाडांची लागवड करावी यासाठी नियोजन समितीतून निधीची उपलब्धता केली जाईल असे सांगितले.प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी वाखरी तळावर भाविकांसाठी घेण्यात येत असलेल्या सोयी सुविधा तसेच पत्रा शेड येथे नियोजित दर्शन मंडप व स्काय वॉक ची माहिती दिली.

त्याप्रमाणेच ६५ एकर वर भाविकांसाठी देण्यात येत असलेल्या व नदीपात्रात प्रशासनाच्या वतीने करण्यात येत असलेल्या सुविधांची माहितीही त्यांनी दिली.यावेळी त्यांच्या समवेत आमदार समाधान आवताडे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद , मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संजय माळी, महावितरणचे अधीक्षक अभियंता सुनील माने, प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, कार्यकारी अभियंता अमित निंबकर, गटविकास अधिकारी सुशील संसारे, सहाय्यक नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे, महामार्ग प्राधिकरणाचे केशव घोडके तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

---

# गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार अंतर्गत रु.९ कोटी निधीला मंजुरी - आ.दाते

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२१, सुपा (अहिल्यानगर) :** सोमवार, दिनांक २१ एप्रिल २०२५ जिल्हा जलसंधारण अधिकारी मृदू व जलसंधारण विभाग अहिल्यानगर गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना - २०२५ अंतर्गत पारनेर तालुक्यातील पाझर तलाव व शिवारातील गाळ उपसा करण्यासाठी मतदारसंघातील प्रस्ताव आलेल्या ९० तलावांतील गाळ उपसा करण्यासाठी रु. ९.०६ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती आमदार काशिनाथ दाते यांनी दिली आहे. ही योजना ३ वर्षाकरिता मर्यादित न राहता कायमस्वरूपी राबविण्यात येणार असल्याचेही आ . दाते यांनी सांगितले आहे.

सदर योजनेत स्थानिक शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेऊन योजनेचा लाभ घ्यावा. तसेच सार्वजनिक व खाजगी भागीदारी, अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर, सनियंत्रण, मूल्यमापन तसेच शेतकऱ्यांना अनुदानाची मर्यादा, अंमलबजावणी संदर्भातील मार्गदर्शन व कार्यपद्धती, सनियंत्रण समिती, निधीचे स्रोत याबाबतची माहिती देण्यात येणार आहे तसेच गाळ उपसा करणेकरीता आवश्यक असलेली यंत्रसामग्री व

> शासनाच्या गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेचा शेतकऱ्यांनी फार मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा, गाळमुक्त झाल्याने तलावाची साठवण क्षमता काढून पाझराचे प्रमाण वाढेल, तालुक्यातील हजारो हेक्टर जमीन सुपीक होऊन भुगर्भातील पाणी पातळीत वाढ होईल.
>
> **आ.काशिनाथ दाते (विधानसभा सदस्य)**

इंधनावरील खर्च दोन्ही मिळून (३१ प्रति घ.मी. यानुसार) व गाळ वाहून नेण्यासाठी अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांना एकरी रु. १५ हजार मर्यादेत (प्रति घ.मी. रु. ३५.७५ प्रमाणे) शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या निधीमधून सन. २०२४-२५ या आर्थिक वर्षात जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत या लेखाशीर्षातून करण्यात येणार आहे.

गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेअंतर्गत ९० कामांना प्रशासकीय मान्यता दिली असून अशासकीय संस्थांचे ठरावानुसार अशासकीय संस्थेत काम वाटप करण्यास मान्यता दिली असल्याचे आ. दाते यांनी सांगितले आहे.

---

# थोडक्यात

## राष्ट्रीय लोक दल पक्षाची आगामी पालिका निवडणुकीसाठी मुंबईसह महाराष्ट्रात सदस्यता मोहीम सुरु

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.२१, मुंबई :** आगामी बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुका लक्षात घेता मुंबईतील सर्व राजकीय पक्षांनी त्यांच्या संघटना मजबूत करण्यासाठी प्रयत्नांना सुरूवात केली आहे.




राष्ट्रीय लोक दलानेही मुंबईत आपला पाया वाढवायला सुरुवात केली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्र सरकारचे मंत्री चौधरी जयंत सिंह यांनी आंबेडकर जयंती निमित्त आरएलडीच्या सदस्यता मोहिमेची सुरुवात करण्याची माहिती पक्ष कार्यकर्त्यांना दिली होती. राष्ट्रीय लोक दलाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष डॉ.वेदप्रकाश तिवारी यांनी राष्ट्रीय लोक दलाच्या महाराष्ट्र प्रदेश जनसंपर्क कार्यालयात एका कार्यक्रमाचे आयोजन करून दक्षिण मुंबई लोकसभा, दक्षिण मध्य मुंबई लोकसभा, उत्तर मुंबई लोकसभा, वायव्य लोकसभा, ईशान्य मुंबई लोकसभा मतदारसंघ आणि नवी मुंबई शहरातील विविध राजकीय पक्षांमधील शेकडो कार्यकर्त्यांना राष्ट्रीय लोक दल पक्षात सामील करून घेतले. यासोबतच प्रदेशाध्यक्ष डॉ.वेदप्रकाश तिवारी यांनी संघटनेतील काही महत्त्वाच्या नियुक्त्यांची घोषणा केली आहे. यामध्ये महाराष्ट्र राज्य युवा अध्यक्षपदी भरत व्यंकट सारगे, मुंबई सरचिटणीस पदी अजमत रज्जाब खान, डॉ.अशरफ अली चौधरी, मुंबई सचिव पदी चंद्रकांत बाबू कोळी, दिनेश सागरमल जैन, अरविंद यादव, दक्षिण मुंबई जिल्हा अध्यक्षपदी नदीम शेख, मुंबई युवा अध्यक्षपदी निसार अन्सार खान, मुंबई युवा सचिवपदी तृप्ती जितेंद्र मोरे, मुंबई व्यवसाय सेल अध्यक्षपदी मुकेश जोशी, नवी मुंबई अध्यक्षपदी अकबर सय्यद यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. डॉ.वेदप्रकाश तिवारी म्हणाले की, राज्यभरातून हजारो कार्यकर्ते आरएलडी मध्ये सामील होण्यास उत्सुक आहेत आणि भविष्यातही पक्षात सामील होण्याची प्रक्रिया सुरू राहील.

## शिवसेनेच्या डहाणू विधानसभा जनसंपर्क कार्यालयाचा भव्य शुभारंभ तलासरीत संपन्न

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२१, तलासरी (पालघर) :** डहाणू विधानसभा क्षेत्रात शिवसेनेच्या सामाजिक आणि राजकीय कार्याला नवसंजीवनी देणाऱ्या जनसंपर्क कार्यालयाचे भव्य उद्धाटन तलासरी



येथे जल्लोषात पार पडले. या प्रसंगी पालघर जिल्हाध्यक्ष कुंदन संखे, महाराष्ट्र राज्य आदिवासी जनजाती आयोगाच्या सदस्या वैद्यही वाढण, माजी मंत्री मनीषा निमकर, डहाणू विधानसभा प्रमुख सुनील इभाड, युवा एल्गार आघाडी संस्थापक अध्यक्ष व डहाणू-पालघर विधानसभा संघटक ॲड. विराज गडग, आदिवासी सेल जिल्हा प्रमुख वसंत भसरा, उत्तर भारतीय प्रमुख डहाणू विधानसभा पप्पू यादव, डहाणू विधानसभा संघटक विजय माळी, वैद्यकीय सेल प्रमुख सुरेश परेड तसेच शेकडो शिवसैनिक आणि पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यालयाच्या माध्यमातून शिवसेनेचा समाजाभिमुख दृष्टिकोन अधोरेखित होत असून, हा उपक्रम केवळ राजकीय नव्हे तर सामाजिक बांधिलकीचा भक्कम दुवा ठरणार आहे. उद्घाटनप्रसंगी अनेक कार्यकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त करत सांगितले की, याआधी कार्यालय अभावी अनेकदा नागरिकांच्या अडचणी वेळेत सोडवता येत नव्हत्या, मात्र आता हे कार्यालय एक प्रभावी दुवा ठरेल.

कार्यकर्त्यांनी ठामपणे सांगितले की, हे आमचं हक्काचं ठिकाण आहे. आता आमचं कार्य अधिक संघटित, गतिमान आणि लोकाभिमुख होईल. जी व्यक्ती या कार्यालयात पाऊल ठेवेल, ती निश्चितपणे समाधान घेऊनच बाहेर पडेल. हे कार्यालय समाजासाठी सदैव खुले राहील. या कार्यालयाच्या स्थापनेत ८० टक्के सामाजिक आणि २० टक्के राजकीय विचारसरणीवर भर देण्यात आला आहे. शिक्षण, आरोग्य सेवा, युवकांसाठी रोजगाराचे संधी, महिलांचे सबलीकरण, आदिवासी हक्कांचे रक्षण अशा विविध सामाजिक उपक्रमांचे नियोजन येथून प्रभावीपणे केले जाणार आहे. शिवसेनेचे हे जनसंपर्क कार्यालय तलासरी व डहाणू परिसरातील जनतेसाठी नव्या आशेचा किरण ठरेल, आणि भगवा विचार समाजाच्या सर्व थरांपर्यंत पोहोचवेल, असा विश्वास या वेळ उपस्थित मान्यवरांनी आणि कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

## भैरवनाथ, कालिशाबाबा यात्रेला जंगी कुस्त्यांचा आखाडा - रांजणगाव

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२१, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील रांजणगाव मशिद येथे सालाबाद प्रमाणे भैरवनाथ यात्रा, कालिशाबाबा यात्रा निमित्ताने करमनुकिचे अनेक कार्यक्रम साजरे



करण्यात आले. त्यामध्ये आर्रकेस्ट्राचे ही नियोजन करण्यात आले. यात्रा उत्सावाची सांगता म्हणून जंगी कूस्त्यांचा आखाडा पार पाडण्यात आला. आखाड्यासाठी जिल्ह्यातून अनेक पहिलवानांचे आगमन झाले. अगदी लहान मल्ला पासुन कूस्त्या सुरु झाल्या,परंतु लहान वयोगटातील कुस्त्याच !पाहण्यात प्रेक्षकांचा जयघोष दिसुन आला. रांजणगाव येथील आखाड्यात निकाली कुस्त्यांची परपंरा आज पहावयास मिळते १०० रुपयाच्या कुस्तीपासुन सुरुवात होऊन ५० हजार रुपयांची शेवटची कुस्ती ही पारनेर तालुक्याचं तरुणांचं आधार स्थान, आणी रांजणगावचं भुषन, असे पारनेर तालुकाभाजपचे अध्यक्ष राहुल शिंदे (पाटील) यांच्या प्रमुख उपस्थित ही मानाची शेवटची कुस्ती खेळली गेली,या शेवटच्या कुस्तीनेच आखाड्यांची सांगता करण्यात आली.

या सर्व कार्यक्रमाचे नियोजन बळवंतराव उर्फ आप्पासाहेब शिंदे यांच्या अधिपत्याखाली यात्रा कमेटीचे सर्व मेंबर, गावचे सरपंच महेश देशमुख, उपसरपंच दादा शिंदे, बंटी साबळे, भाऊ देशमुख, नंदकुमार शिंदे, शरद सरोदे, आप्पासाहेब देशमुख, चेअरमन अनिल जवक, चंद्रकांत शिंदे (सर) सरपंच बाबा जवक अदी सर्व ग्रामपंचायत सदश्य, सेवा संस्थांचे संचालक यांनी केले.




# विदर्भ आणि मराठवाडा सीमेवरचा सहस्रकुंड धबधबा पर्यटकांचे लक्ष वेधत आहे

**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.०१, किनवट (नांदेड) :** किनवट तालुक्यातील आणी मराठवाडा विदर्भाच्या सिमेवर असलेला सहस्त्रकुंड धबधबा सध्या पर्यटकांचे लक्ष वेधत आहे. पावसाळा सुरू होताच गेल्या ८ ते १० दिवसात किनवट तालुक्यात मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे सहस्त्रकुंड धबधब्यावरू पाणी ओसंडणू वाहत आहे. त्यामुळे पावसाळ्याचा सुरवातीलाच सहस्त्रकुंड धबधबा पर्यटकांचे लक्ष वेधत आहे. धबधब्याचा अलीकडचा भाग जिल्ह्याच्या किनवट तालुक्यात येतो. तर पलीकेडचा भाग यवतमाळ जिल्ह्यातील (विदर्भात) येतो. हा धबधबा किनवट पासुन ४० किलोमीटर वर तर नांदेड पासुन ८० किलोमीटर अंतरावर आहे. पावसाळ्यात हा धबधबा पर्यटकांचे डोळ्यांचे पारने फेडत आहे.

# देव्हारी तांडा गावात जागोजागी घाणीचे साम्राज्य...

**अक्षराज : बहादुर चव्हाण**

**दि.०१, छ. संभाजीनगर :** सोयगाव तालुक्यातील एकमेव देव्हारी तांडा ग्रामपंचायत आर.आर. पाटील पुरस्कार प्राप्त या गावात घाणीचे साम्राज्य पसरले असून गावकऱ्यांच्या आरोग्याकडे ग्राम पंचायतीचे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.



गावातील संपूर्ण रस्त्यांवर घाणीचे साम्राज्य पसरले असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याकडे ग्रामपंचायत प्रशासन मात्र पूर्णपणे दुर्लक्ष करत असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे. या गावामध्ये मूलभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणात अभाव आहे. ह्या सुविधा पुरवण्यासाठी ग्रामपंचायत प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरत आहे. गावांमध्ये बहुतांश रस्त्यांचे बांधकाम झालेले नसल्याने गटार देखील बांधण्यात आलेली नाहीत.

त्यामुळे गावातील संपूर्ण सांडपाणी व पावसाचे पाणी रस्त्यावर संपूर्ण सांडपाणी रस्त्यावर तुंबल्याने सर्वदूर गटरे साचली आहेत, असा आरोपही गावकऱ्यांनी केला आहे. या साचलेल्या पाण्यात मोठ्या प्रमाणात डासांची उत्पत्ती होत आहे. सोबतच दुर्गंधीमुळे देखील नागरिक बेजार झाले आहेत. त्यामध्ये देव्हारी तांडा मध्ये डेंग्यू आणि मलेरियाचा प्रादुर्भाव होत असल्याने या घाणीचे साम्राज्याचे परसल्याने गावकऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. यासंदर्भात नागरिकांनी वेळोवेळी तोंडी तक्रारी केल्या.

मात्र ग्रामपंचायतीने दुर्लक्ष केले असे गावकऱ्यांनी सांगितले आहे. सरपंच गावात असून सुद्धा घाणीचे साम्राज्य कडे दुर्लक्ष करताना दिसत व ग्रामसेवक हा गावांमध्ये राहत नसल्यामुळे घाणच साम्राज्य कडे दुर्लक्ष करताना दिसत आहे . त्यामुळे जिल्हा प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन गावातील समस्यांचे निवारण करावे अशी मागणी गावकऱ्याकडून करण्यात आली आहे.

# वेद शैक्षणिक संकुलात डॉ.अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळकांना अभिवादन

**अक्षराज : आश्रुबा कोठावळे**

**दि.०१, कळंब (धाराशिव) :** लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त व लोकमान्य टिळकाच्या पुण्यतिथीनिमित्त धनेश्वरी शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ.प्रतापसिंह पाटील यांच्या प्रेरणेने प्राचार्य सतिश मातने यांच्या म ार्गदर्शनाखाली वेद शैक्षणिक संकुलातील भैरवनाथ अध्यापक विद्यालय व भैरवनाथ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत दि.१ ऑगस्ट २०२४ रोजी भैरवनाथ अध्यापक विद्यालयाचे मराठी विभाग



प्रमुख प्रा.शीकांत पवार यांच्या हस्ते लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले तर औद्योगिक संस्थेचे प्राचार्य सुरज भांडे यांच्या हस्ते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यप्रसंगी सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.अविनाश घोडके यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून डॉ.अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या जीवन व कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी निदेशक अविनाश म्हेत्रे, राजकुमार शिंदे, सचिन राऊत,विनोद जाधव,विनोद कसबे आदींची उपस्थिती होती.

# दै.अक्षराज इम्पॅक्ट : बँक ऑफ इंडिया-आबलोली शाखेच्या ग्राहकांची गैरसोय होणार दूर

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०१, गुहागर :** बँक ऑफ इंडिया-आबलोली शाखेच्या गलथान कारभारा बाबत ग्राहकांची तिव्र नाराजी लक्षात घेत गुहागर भाजपा वतीने तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता, सदर विषयी दैनिक अक्षराजच्या म ाध्यमातून लक्ष वेधण्यात आले होते,त्याची युद्धपातळीवर दखल घेत,


अक्षराज
बँक ऑफ इंडिया - आबलोली शाखेच्या गलथान कारभार ; ग्राहकांकडून तीव्र नाराजी



बँक ऑफ इंडिया शाखेमध्ये वरिष्ठ पातळीवरून पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध करून दिला असून वारंवार खंडित होणाऱ्या कनेक्टिव्हिटी मध्ये कायमस्वरूपी सुधारणा होण्यासाठी रेडिओ फ्रिकेन्सी ही प्रणाली वरीष्ठ कार्यालयाने मंजूर केली असून यामुळे या शाखेतील वारंवार खंडित होणाऱ्या इंटरनेट सुविधेची गैरसोय आता कायमची दूर होणार आहे. रेडिओ फ्रिकेन्सीची प्रोसेस दीड ते दोन महिन्यात पूर्ण होणार असून यामुळे वारंवार होणाऱ्या गैरसोयीतून बँकेच्या ग्राहकांची कायमची मुक्तता होणार आहे.

बँक ऑफ इंडिया शाखा आबलोलीमध्ये खातेदारांना मिळणारी वागणूक, सेवेत होणारा विलंब आणि त्याचबरोबर शाखेतील इंटरनेट सेवेचा खंडित होणारा पुरवठा यामुळे येथील २० ते २५ किलोमीटर परिसरातील बँकेच्या ग्राहकांची फारच गैरसोय होत होती. जनतेला आर्थिक भुर्दंड,वेळेचा अपव्यय सहन करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष निलेश सुर्वे आणि सर्व पदाधिकारी,खातेदार यांनी १९ जुलै २०२४ रोजी बँक ऑफ इंडिया- आबलोली शाखेमध्ये जाऊन शाखाधिकार्यांना निवेदन देत या बाबींमध्ये १५ दिवसात सुधारणा करावी अन्यथा शाखेच्या मुख्य प्रवेश द्वारा जवळच आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला होता. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन बँक ऑफ इंडिया शाखेचे शाखाधिकारी श्री यांनी भाजप तालुकाध्यक्ष निलेश सुर्वे यांना ३० जुलै २०२४ रोजी शाखेत बोलावुन खातेदारांच्या होणाऱ्या गैरसोयीबद्दल, अनियमित सेवेबद्दल दिलगीरी व्यक्त केली आहे.

त्याचबरोबर शाखेमध्ये आवश्यक असणारा कर्मचारी वर्ग, अनियमित इंटरनेट कनेक्टिव्हिटी यासारख्या प्रश्नांचा वरिष्ठ कार्यालयाशी सततचा पाठपुरावा केल्याचे सांगत पुरेसा कर्मचारी वर्ग ही उपलब्ध झाला आहे आणि इंटरनेट कनेक्टिव्हिटी कायमस्वरूपी सुधारण्यासाठी रेडिओ फ्रिकेन्सी ही नवीन प्रणाली प्रधान कार्यालयाने मंजूर केली असल्याचे सांगितले. ही रेडियो फ्रिकेन्सी प्रणाली प्रोसेस होण्यासाठी दीड ते दोन महिन्यांचा कालावधी लागणार असून ही प्रणाली सुरू झाल्यानंतर ग्राहकांची गैरसोय दूर होणार आहे. या व्यतिरिक्त कर्मचारी आणि खातेदारांचा समन्वय योग्य रीतीने करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगत आज पर्यंत जसे आपण सर्वांनी आणि खातेदारांनी बँकेला साथ दिली आहे तशीच आम्हाला साथ द्या.ग्राहकांना चांगली सेवा देण्याची खात्री आणि हमी देत असल्याचे सांगत बेरोजगारांना रोजगार निर्मितीसाठी बँक ऑफ इंडिया अबलोली शाखेचे एक पाऊल पुढे असेल असे सांगितले. सुर्वे यांना या आशयाचे पत्रही दिले आहे.

शाखाधिकारी आणि त्यांचे वरिष्ठ कार्यालयातील पदाधिकारी यांनी आपण खातेदारांच्या अडीअडचणी लक्षात घेऊन दिलेल्या तीव्र आंदोलनाच्या पत्राची दखल घेतली आणि आपल्या कार्यपद्धतीमध्ये आणि इंटरनेटसेवेत सुधारणा करणार असल्याचे सांगितल्यामुळे भाजप तालुका अध्यक्ष निलेश सुर्वे यांनी आपल्या सर्व सहकारी, पदाधिकाऱ्यांच्यावतीने आणि बँकेच्या खातेदारांच्या वतीने समाधान व्यक्त केले आहे. मात्र पुरेशा कालावधीमध्ये या सुधारणा झाल्या नाही तर पुन्हा हाच पवित्रा घेणार असल्याचे निलेश सुर्वे यांनी शाखाधिकारी यांना सांगितले आहे.

# बोराडी बिट अंतर्गत शिक्षण परिषद संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.०१, शिरपूर :** बोराडी, कोडिद, उमर्दा केंद्राचे बीटस्तरीय शिक्षण परिषद बोराडी येथील पंडीत जवाहरलाल नेहरु माध्यमि क विद्यालय येथे संपन्न झाली.

या शिक्षण परिषदेचे अध्यक्षस्थान शिक्षण विस्तार अधिकारी आर.के.गायकवाड यांनी भूषविले. तसेच या शिक्षण परिषदेत इयत्ता पहिली ते इ.आठवीच्या तासिकानुसार प्रत्येक वर्गाचे अध्ययनस्तर विश्लेषण याविषयावर शिक्षण विस्तार अधिकारी आर.के.गायकवाड, केंद्रप्रमुख जितेंद्र जोशी, विजयानंद, शिरसाठ, भाऊसाहेब नेटके, मोतीलाल पाटील, आर्दीनी शैक्षणिक गरजांबाबत चर्चा, पुढील अध्यापनाचे नियोजन, चर्चात्मक पध्दतीने तासिकांचे नियोजन व अध्ययनस्तर विश्लेषण करीत शिक्षकांशी चर्चा करुन, संवाद साधत मार्गदर्शन केले. याप्रसंगी बोराडी बिटाचे शिक्षक व शिक्षकेत्तर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पदो.मुख्याध्यापक, जि.प.शाळा, संतगाडगेनगर, एकलव्यपाडा, न्युबोराडी, मांजरबर्डी, वाकपाडा, आपसिंगपाडा, सरदारपाडा आदी शाळेच्या सर्व शिक्षकांनी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# अमरजीत गोडबोले यांचे सुयश

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.१, नागपूर :** महानिर्मिती मध्ये कार्यरत कल्याण अधिकारी अमरजीत गोडबोले यांनी नुकतीच Dr. B. R.A. Law College, नागपूर विद्यापीठातून LLB (विधी) ची पदवी प्रथम श्रेणीत प्राप्त केली.

महादुला शीवास नगर येथील दिवंगत ग्रामपंचायत सदस्य युवराज गोडबोले यांचे सुपुत्र अमरजीत गोडबोले यांनी अतिशय संघर्षशील परिस्थिती मधून मेहनत आणि चिकाटीने तिरपुडे समाजकार्य महाविद्यालय मधून इड्थ आणि नामवंत कर्वे इन्स्टिट्यूट ऑफ सोश्यल सर्व्हिसेस, पुणे येथून चड्थ मध्ये प्राविण्य मिळवून विविध नामांकित कंपन्यामध्ये मोठ्या पदावर कार्य केलेले असून सध्या महानिर्मिती कंपनी मध्ये कल्याण अधिकारी या पदावर कार्यरत आहेत.तसेच विविध समाजसेवी संस्थेच्या माध्यमातून वडिलोपार्जित समाज सेवेचा वसा घेऊन गरजु विद्यार्थ्यांना मदत करणे, आरोग्य तपासणी शिबिर घेणे तसेच गरजू आणि गरिबांना मदत करण्याकरिता सदैव अग्रेसर असतात.

या यशाकारिता माजी मंत्री तथा विद्यमान आमदार चंद्रशेखरजी बावनकुळे, महानिर्मिती कार्यकारी संचालक राजेश पाटील, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी पुरुषोत्तम वारजूरकर, नगराध्यक्ष राजेश रंगारी, सरपंच भाऊराव गोमासे, सरपंच नरेंद्र धानोले, राजेश मच्छले, पन्नालाल रंगारी, पंकज ढोणे यासमवेत क्रांतिसूर्य स्मारक समिती महादुला, क्रातिवीर श्यामलाल बाबू शीवास स्मृती बहुद्देशीय संस्थेच्या सर्व पदाधिकारी यांनी अभिनंदन केले.

# ऋतिक बंडेवार यांनी पटकाविले सुवर्णपदक

**अक्षराज : कीर्तिमाला महाबळे**



**दि.१, लोहा (नांदेड) :** नांदेड जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती श्रीनिवास बंडेवार यांचा मुलगा ऋतिक श्रीनिवास बंडेवार यानी गोवा येथे पार पडलेल्या राष्ट्रीय स्तरावरील बॉक्सिंग स्पर्धेमध्ये सुवर्ण पदक पटकावले असून लोहा तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा मिळविला आहे.

सोनखेड येथील रहिवासी असलेले ऋतिक श्रीनिवास बंडेवार वय-२२ वर्षे यांची लहानपणापासूनच खेळाडू वृत्तीकडे सततची धाव असल्यामुळे बँकिंग क्षेत्रामध्ये शैक्षणिक पदवी पूर्ण करीत खेळावर पण लक्ष केंद्रित केले होते. प्रथम त्यांनी जळगाव येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळविले होते. त्यानंतर काल गोवा येथे नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेमध्ये तामिळनाडूच्या खेळाडूचा पराभव करून महाराष्ट्राचे नेतृत्व करत ऋतिक श्रीनिवास बंडेवार यांनी सुवर्णपदक पटकाविले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल तालुक्यासह सोनखेड परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

# विंचूर येथे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**



**दि.१, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील त्रिफुलीवर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून लोकशाहीर आण्णाभाऊ साठे मित्र मंडळाकडून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळेस गावातील अनेक मान्यवर उपस्थित होते.तसेच जिल्हा परिषद मराठी शाळा विंचूर येथे आण्णाभाऊ साठे मित्र मंडळाकडून विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास उपस्थित विंचूरचे प्रथम नागरिक सरपंच सचिन दरेकर, इमरान मोमीन, ज्ञानेश्वर पवार (माजी जि. सदस्य), निलेश दरेकर, पोलीस रामदास घुमरे, पोलिस आरोटे, हेमंत बागुल, राहुल विस्ते, नितीन थोरात, सचिन राजगिरे, गोरख पारधे, प्रतिक भांड, विकास म्हसाळे, दिपक कांबळे, मंगेश पाचरणे, दत्तु पारधे, अजय विस्ते, वाल्मीक विस्ते, किशोर पाचरणे, चंद्रकांत पारधे, संतोष थोरात, निलेश आहिरे, कृष्णा पारधे, जि. प. शाळा विंचूर शिक्षक व शिक्षिका इ.उपस्थित होते.

# श्रीगोंदात लवकरच अद्यावत क्रीडा संकुल - दिघे

**अक्षराज : रोहन रंधवे**

**दि.०१, श्रीगोंदा :** श्रीगोंदाला अद्यावत असे विविध खेळांसाठी क्रीडा संकुल उभारण्याचे नियोजन चालू असल्याचे प्रतिपादन जिल्हा क्रीडा अधिकारी दिलीपराव दिघे यांनी केले. श्रीगोंदा तालुका आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा तसेच क्रीडा समितीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. तहसीलदार डॉ.क्षितिजा वाघमारे, जिल्हा क्रीडा अधिकारी दिलीपराव दिघे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी राज्य क्रीडा मार्गदर्शक ज्ञानेश्व खुरंगे, राज्य क्रीडा महासंघाचे अध्यक्ष राजेंद्र कोतकर, क्रीडा समितीचे माजी अध्यक्ष बापूसाहेब गायकवाड, शिक्षक बँकेचे चेअरमन दिलीपराव काटे, बाजार



समितीचे संचालक रामदास झेंडे, प्राचार्य दिलीप भुजबळ, मुख्याध्यापक रामजान सय्यद, रामदास फटाकडे, राजेंद्र जामदार, राजेंद्र बारगुजे, नंदकुमार शितोळे,आदी उपस्थित होते.

क्रीडा शिक्षकांच्या मागण्यांचा आणि क्रीडा क्षेत्रातील समस्यांचा शासनाने विचारणा केल्यास येणाऱ्या शालेय क्रीडा स्पर्धांवर राज्य पातळी बहिष्कार घालण्याची भूमिका क्रीडा शिक्षक संघटनेचे राज्य अध्यक्ष राजेंद्र खोतकर यांनी व्यक्त केली.

अलीकडे क्रीडा नियमांमध्ये बराच बदल झाला आहे तो बदल आत्मसात करून शिक्षकांनी स्वतःला आधुनिक बनवले पाहिजे असे प्रतिपादन राज्य क्रीडा मार्गदर्शक ज्ञानेश्वर खुरंगे यांनी केले.

यावेळी श्रीगोंदा तालुका क्रीडा समितीची निवड करण्यात आली. तालुकाध्यक्षपदी सचिन जामदार, उपाध्यक्ष रोहन रंधवे, अजय गाडेकर, कार्याध्यक्ष संजय गायकवाड, सचिव तुषार नागवडे, सहसचिव रविंद्र भोंडवे, खजिनदार कल्पक राउत, प्रसिद्ध प्रमुख शशिकांत उबाळे, महिला प्रतिनिधी अर्चना कोरडे यांची निवड करण्यात आली.

# भाजपा युवा मोर्चा नांदेड उत्तरच्या जिल्हा उपाध्यक्षपदी बबलू नाईक यांची निवड



**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.०१, किनवट (नांदेड) :** गेल्या अनेक वर्षापासून भारतीय जनता पार्टीचे प्रामाणिकपणे काम करून पक्ष मजबुतीसाठी कार्य करणारे बबलू नाईक यांच्या कार्याची दखल घेत भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा नांदेड उत्तरच्या जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली असून नुकतेच नियुक्तीपत्र आमदार भीमरावजी केराम यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले आहे.

आमदार भीमराव केराम यांचे अत्यंत विश्वासू समजल्या जाणारे संजय गांधी निराधार योजनेचे सदस्य बबलू नाईक यांची भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा नांदेड उत्तर जिल्हा उपाध्यक्षपदी जिल्हाध्यक्ष संदीप राठोड यांनी निवड केली असून तसे नियुक्तीपत्र आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन पुढील कार्यास त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष मारोती भरकड, पप्पू करनेवाड, अशोक जाधव, देवराव आडे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांची यावेळी उपस्थिती होती.

दरम्यान पक्षाने जो माझ्यावर विश्वास टाकत माझी निवड केली आहे. त्या निवडीचे सार्थ ठरवत येणाऱ्या भविष्यकाळात पक्ष वाढीसाठी मी प्रामाणिकपणे काम करून पक्षाने दिलेली जबाबदारीचे सार्थ ठरवेल अशा प्रतिक्रिया निवडीनंतर दैनिक अक्षराज पत्रकाराशी बोलताना बबलू नाईक यांनी दिल्या आहेत.

# कापूस पिकातील आकस्मिक मर व्यवस्थापन शेतकऱ्यांनी तात्काळ करावे - संजय पवार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, शिरपूर :** बऱ्याच ठिकाणी झालेल्या पाऊसानंतर कपाशीच्या शेतामधील झाडे अचानक जागेवर सुकू लागलेली आहेत. याला आकस्मिक मर असे म्हणतात.

कपाशीच्या आकस्मिकमर मध्ये दीर्घकाळ पाण्याचा ताण पडल्यानंतर जमिनीचे तापमान वाढलेले असते. अशावेळी सिंचन दिल्यास अथवा पाऊस पडल्यास झाडाला धक्का बसून अचानक झाड सुकते आणि कालांतराने झाडाची पाने गळतात. सिंचन दिल्यानंतर किंवा पाऊस पडल्यानंतर ३६ ते ४८ तासांत आकस्मिक मर ची लक्षणे दिसू लागतात. सुकल्यानंतर पानगळ होऊन कालांतराने झाडे मरतात त्यामुळे उत्पादनात मोठे नुकसान होऊ शकते अशावेळी मात्र कपाशी उत्पादक शेतकर ऱ्यांनी जागृत राहून तात्काळ आकस्मिक मर व्यवस्थापन करावे असे आवाहन तालुका कृषी अधिकारी संजय



पवार यांनी केले आहे. यासाठी आपल्या शेतातील अतिरिक्त पाण्याचा लवकरात लवकर निचरा करवा, शेताला वापसा येताच कोळपणी व खुरपणी करावी, त्वरीत २०० ग्रॅम युरिया त्यात १०० ग्रॅम पांढरा पोटॅश (००:००:५० खत ) व २५ ग्रॅम कॉपर ऑक्सीक्लोराईड प्रति १० लिटर पाण्यात मिसळून तयार द्रावणाची प्रति झाड १०० मिली याप्रमाणे आळवणी करावी,

किंवा १ किलो १३:००:४५ त्यात २ ग्रॅम कोबाल्ट क्लोराईड व २५० ग्रॅम कॉपर ऑक्सीक्लोराईड २०० लिटर पाण्यातून मिसळून तयार द्रावणाची प्रति झाड १०० मिली आळवणी करावी. तसेच या द्रावणाची आळवणी केल्यानंतर सुकू लागलेल्या झाडाजवळची माती पायाने लवकरात लवकर दाबून घ्यावी.

तरी शेतकऱ्यांनी या उपाय योजना शेतामध्ये झाडे सुकू लागलेली दिसताच लवकरात लवकर म्हणजे २४ ते ४८ तासाच्या आत कराव्यात जेणेकरून पुढील होणारे मोठे नुकसान वेळीच टाळता येईल. असेही पवार यांनी सांगितले.

# अण्णाभाऊंच्या कार्याचा आदर्श तरुणांनी घ्यावा : डॉ.भाऊसाहेब खिलारी




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१, पारनेर (अ.नगर) :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंनी जिवाचं रान करून समाजात बंधुता नांदावी, तसेच समाज एकसंघ असावा यासाठी आपल्या साहित्यातून वंचित, दुर्लक्षित व क्षुद्र समजल्या गेलेल्या समाजातील पुरुष, स्त्रिया आणि कामगार यांचे दुःख दारिद्र्य प्रखर पणे मांडले आजच्या युवा पिढीने अण्णाभाऊंच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून समाजाची सेवा करावी असे मत अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी यांनी केले. अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्था संचालित श्री ढोकेश्वर माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि संस्थेचे माजी उपाध्यक्ष रामनाथजी वाघ यांच्या जयंतीनिमित्त डॉ. खिलारी बोलत होते. यावेळी विद्यालयात या महापुरुषांच्या जयंती आणि पुण्यतिथी निमित्त वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. रवींद्र मते, कल्पना जाधव व निलम खिलारी यांनी वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षण केले. वक्तृत्व स्पर्धेत प्रभावी आणि उत्स्फूर्त भाषण करणाऱ्या प्रियल एकनाथ झावरे हिला डॉ. खिलारी यांनी १००० रुपये रोख बक्षीस दिले आणि अभिनंदन केले. तसेच ओमं कोम्प्युटर मार्फत घेण्यात आलेल्या एम. के. सी. एल. ऑलिम्पियाड मोव्हमेन्ट या परीक्षेत जिल्ह्यात प्रथम आलेल्या इयत्ता ७ वी च्या साई दत्तात्रय चिकणे याचा रोबोटीक किट देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य सुनिल वाव्हळ, पर्यवेक्षक शिवाजी सावंत यांनी विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी ज्येष्ठ शिक्षक बाळासाहेब निवडुंगे, शास्त्र समन्वयक, अशोक गांगड, कला समन्वयक विजय सोबले, मल्हारी वाघसकर, रवींद्र ज्योतिक, संदीप महांडुळे , भाऊसाहेब हिंगडे, ओमं रांधवण, यशवर्धन गागरे, अतुल सैद, वैशाली गायखे, बाबासाहेब जाधव, सुरेखा ठाणगे, सोनल रोहकले, वर्षा भोंडवे, वैशाली ढोकळे, सुशांत खेडकर, सिमा चिकणे , सविता शिंदे इत्यादी शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# मोफत आरोग्य तपासणी व औषधे वाटप शिबिर

**अक्षराज : सरिता डोंगरे**

**दि.०१, चिंचवड (पुणे) :** जगतगुरू संत तुकाराम महाराज पालखी सोहळा नुकताच पंढरपूर कडून परत देहूकडे आला. वारकऱ्यांना पालखी परतीच्या वेळी आरोग्याच्या अनेक समस्या जाणवतात.

म्हणूनच पिंपरी गावांत पालखी सोहळा मुक्कामी आली असता पालखीतील वारकरी व भाविकांचे आरोग्य योग्य राहावे त्यांची आरोग्य सेवा घडावी.

यासाठी वूई टुगेदर फाउंडेशन, मधुकर बच्चे युवा मंच व गणेश वाळुंजकर मित्र परिवार यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक पिंपरी गाव येथे मोफत आरोग्य तपासणी व औषधे वाटप शिबीर घेण्यात आले. सर्व प्रकारचे साथीचे आजार, शुगर, बीपी, आदी महत्वाच्या आजारावर वारकऱ्याची तपासणी करून आवश्यक औषधे देण्यात आली

या शिबिरात वारकरी व भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. आयोजकांच्या वतीने तीन डॉ. चार फार्मासिस्ट, २० स्वयंसेवक, तसेच संस्थेचे पदाधिकारी व कार्यकर्ते वारकऱ्याच्या सेवेसाठी मोठ्या संख्येने सहभागी होते.

डॉ. मोहन काळे, मा.उपमहापौर प्रभाकर वाघेरे व मान्यवरांच्या हस्ते शिबिराचे उदघाटन केले. संस्थेचे अध्यक्ष, सलीम सय्यद, गणेश वाळुंजकर, महाराष्ट्र महावितरण समिती सदस्य, वूई टुगेदर फाउंडेशनचे सल्लागार, मधुकर बच्चे, मधुरा दाते, मंगला



सपकाळे- डोळे, सोनाली महाजन, अनिता वाळुंजकर, गणेश ढाकणे, किशोर उदास वसंत ढवळे, कैलास सानप, हणमंत घुगे, संतोष वाघेरे, दिगंबर वाघेरे, दारासिंग महाजन, श्रीरंग दाते, सदाशिव गुरव, जयंत कुलकर्णी, विलास गटणे, विलास जगताप, दिलीप पेटकर, आकाश खिल्लारे, आदिनी शिबीरात् पूर्णवेळ सहभाग घेतला. म ेरया फार्माचे मारुती हाके, पियुष गुप्ता, चैतन्य फार्माचे गणेश बच्चे, पोपट बच्चे, अक्षय गारगोटे, रोहिणी बच्चे आदिनी शिबिरातील साहित्याची मोठी मदत केली.

# कामगार ग्रुपच्यावतीने अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त मूकबधिर मुलांना टॉवेल वाटप

**अक्षराज : राजेश पुरी**

**दि.०१, कळंब (धाराशिव) :** कळंब येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त व लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त कळंब येथील कामगार ग्रुप मोंढा गेट कळंब यांच्या वतीने संत ज्ञानेश्वर महाराज निवासी मूकबधिर विद्यालय कळंब जिल्हा धाराशिव येथे मायेची ऊब देणारे टॉवेलचे सर्व विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून विश्वजीत नरसिंग जाधव यांनी



भाषण करताना अंध श्रीकांत भोले यांची प्रेरणा देणारी गोष्ट सांगितली. या वेळी कार्यक्रमाला कामगार ग्रुप कळंब चे अध्यक्ष बापू माने व उपाध्यक्ष विकास ताकतोडे, सचिव विश्वास ताटे, कोषाध्यक्ष आकाश ताकतोडे,निर्भय घुले, राजाभाऊ टोपे, सुनील देडे, पुरुषोत्तम चाळक, आदित्य पटेकर, निखिल जाधव, अभिषेक अडसूळ, विशाल कांबळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आशुबा कोठावळे यांनी केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक बालाजी जाधवर सर शाळेतील कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# रिमझिम पावसामुळे पिकांवर रोगांचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१, पारनेर (अ.नगर) :** तालुक्यातील टाकळीढोकेश्वर परिसरात मृग नक्षत्राचा पाऊस वेळेवर झाल्यानंतर जून महिन्यात पावसाच्या हलक्या सरी बरसल्या. या कमी जास्त प्रमाणात झालेल्या पावसावर शेतकऱ्यांनी मोठ्या हिमतीने खरिपाची पेरणी केली. त्यानंतर पिकेही जोमात आली परंतू गेल्या चार पाच दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार बुरबुर पावसामुळे पिके रोगाला बळी पडत आहेत. त्यामुळे पिकांची वाढ खुंटुन रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात झाला तसेच पिकांमध्ये तणांचे प्रमाण वाढल्याने मजूर मिळत नसल्याने येथील शेतकरी पुन्हा अडचणीत सापडला आहे. यावर्षी शेतकऱ्यानी महागडी खते, बी बियाणांवर मोठा खर्च करत, पेरणी केली होती. यात बाजरी, सोयाबीन ,मूग, मका, उडीद, तुर, या पिकासोबत वाटाणा पेरणी मोठ्या प्रमाणात झाली आहे. त्यानंतर पावसाच्या हलक्या सरी बरसल्या या पावसावर बियाणांची उगवण झाली. त्यानंतर अनेक दिवस पाऊस गायब झाला.

अनेक दिवसांच्या खंडानंतर तालुक्यातील काही गावांत चांगला पाऊस झाला. यामुळे पिके चांगली जोमात आली परंतु नंतर पाऊस तसा कमी जास्त प्रमाणात होत गेला. पाच दिवसांपासून पारनेर तालुक्यातील टाकळीढोकेश्वर, कान्हुरपठार, ढवळपूरी, वनकुटे, पिंपळगाव रोठा, भाळवणी, निघोज, आळकुटी या परीसरात रिमझिम पावसाने पुन्हा हजेरी लावली. परंतु ऊन पडत नसल्याने पिकांची वाढ खुंटून पिके रोगराईला बळी पडत असून, पिकांमध्ये तणांची मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याने शेतकऱ्यांचा मजुरीवरील खर्च वाढला आहे. तालुक्यातील अनेक गावांत अद्यापही मुसळधार पाऊस नसल्याने नदी नाले वाहिले नाहीत, परिणामी विहिरीच्या पाणीपातळीत वाढ झालेली नाही. त्यामुळे शेतकरी मोठ्या पावसाच्या प्रतीक्षेत आहेत.

# चारु मूर्ती येथील विद्यार्थी बस सेवेपासून वंचित !

**अक्षराज : बहादुर चव्हाण**

**दि.०१, छ. संभाजीनगर :** गाव तिथे एसटी' हे ब्रीद वाक्य मिरवणाऱ्या एसटी महामंडळाची सेवा अजून पर्यंत सोयगाव तालुक्यातील चारू मूर्ती येथील विद्यार्थी व नागरिकांना बस सेवेचा लाभ मिळाला नाही. या गावातील नागरिक विद्यार्थी कित्येक वर्षांपासून एसटीची प्रतीक्षा करीत आहेत. बॉम्बे परिवहन महामंडळाचे १९६० मध्ये महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळात रूपांतर झाले. तेव्हापासून गावांमध्ये बससेवा पोहोचावी यासाठी महामंडळ प्रयत्नरत आहे. जेथे रेल्वे सेवा नाही, अशा सर्व गावांत प्रवासासाठी एसटीशिवाय पर्याय नाही. एसटीचा प्रवास सुरक्षित समजला जातो. त्यामुळे ग्रामीण भागातील लोक मोठ्या आशेने गावाच्या फाट्यावर एसटीच्या प्रतीक्षेत असतात. त्यामुळेच राज्य परिवहन महामंडळाने 'गाव तेथे एसटी' असे ब्रीद घेतले आहे. गत ५० वर्षांच्या खडतर प्रवासात 'गाव तेथे एसटी' या ब्रीद वाक्याचे तीनतेरा वाजले आहेत. सोयगाव तालुक्यातील बस सेवा नसलेल्या गावात एसटी यावी यासाठी अनेकदा निवेदने देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांचे आर्थिक, शैक्षणिक नुकसान थेट गावात एसटी पोचत नसल्याने बालवृद्धांना दोन ते तीन किलोमीटरची पायपीट करत देऊळगाव गुजरी गाठावा लागतो. याचा फटका भावी पिढीला बसत आहे. ग्रामीण भागातील विद्याथ्यांना एवढे अंतर पायी चालत गेल्यावर शाळा गाठावी लागते. त्यामुळे हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. जीव धोक्यात घालून प्रवास एसटी सेवा उपलब्ध नसल्याने ग्रामस्थांना प्रवासासाठी खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागतो. खासगी वाहतूकदारांमध्ये स्पर्धा होते, क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी बसवले जातात. त्यामुळे प्रवाशांचा जीव धोक्यात येतो. सोयगाव तालुक्यात चारू मूर्ती गावे अशी आहेत की, जेथे फाट्यापासून गावाचे अंतर जवळ आहे. रस्ते चांगले आहे, काही गावांमध्ये नदी किंवा नाले आहेत. तर काही ठिकाणी रस्ते खराब आहेत, उत्पन्न कमी असल्याची कारणेही आहेत चारू मूर्ती येथील विद्यार्थ्यांना बस सेवा उपलब्ध होणार का असा हिं प्रश्न चार मूर्ती येथील विद्यार्थ्यांना पडलेला आहे?